POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२५३ ● मुंबई, मंगळवार, १५ एप्रिल २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



टँकर चालकांनी पुकारलेल्या संपामुळे पाणीबाणीची चिंता सतावू लागल्याने उतारा म्हणून मुंबई पालिकेने आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५ लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मुंबईतील खासगी विहिरी, कूपनलिका तसेच पाण्याचे टँकर्स ताब्यात घेतले आहेत. टँकर भरणा केंद्रावर पोलीस तैनात असणार आहेत.

## टँकर चालकांच्या संपावर बीएमसीचा कठोर उतारा... नवीन नियमावली जाहीर

## मुंबईत पाणीबाणी! आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५ लागू

**■मुंबई। प्रतिनिधी :**

एकीकडे राज्यातील धरणांमधील पाणीसाठा कमी होत चालला असतानाच, मुंबईत टँकर चालकांनी संप पुकारल्याने मुंबईकरांची पाण्याची चिंता आणखीनच वाढू लागली आहे. टँकर चालकांनी पुकारलेल्या संपामुळे पाणीबाणीची चिंता सतावू लागल्याने उतारा म्हणून मुंबई पालिकेने आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५ लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. याबाबत पालिका प्रशासनाने नवीन नियमावली जाहीर केली असून मुंबईतील खासगी विहि-री, कूपनलिका तसेच पाण्याचे टँकर्स ताब्यात घेतले आहेत. टँकर भरणा केंद्रावर पोलीस तैनात असणार आहेत. मुंबईकरांना सुरळीत पाणीपुरवठा करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) जाहीर करण्यात आली आहे.

केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या नवीन नियमावलीविरोधात मुंबईतील टँकर चालकांनी संप पुकारला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्रीय जलशक्ती मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या निर्देशांनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने विहीर आणि कूपनलिकाधारकांना बजावलेल्या नोटिशींना स्थगिती दिली. मात्र टँकर चालक संप मागे घेत नसल्याने जनहित लक्षात घेता, महानगरपालिका प्रशासनाने आपत्कालीन व्यवस्थापन कायदा २००५ लागू केला आहे.

### अशी होणार एसओपीची अंमलबजावणी -

- प्रत्येक विभाग कार्यालय पातळीवर विशेष पथकांची स्थापना केली जाईल.
- अधिग्रहित टँकर्स आणि चालक-कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाईल.
- नागरी सुविधा केंद्रांद्वारे टँकरची मागणी नोंदवून संबंधित सोसायट्यांनी शुल्क भरायचे आहे.
- टँकर पुरवठ्यानंतर त्याचे बिल सादर केल्यानंतर टँकर चालकांना संबंधित रक्कम अदा केली जाईल.
- प्रत्येक टँकर भरणा केंद्रावर पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था केली जाईल.
- टँकरचा दर अधिक २५ टक्के प्रशासकीय शुल्क एवढी रक्कम महापालिकेला भरावी लागेल.
- प्रत्येक विभाग कार्यालयात पाण्याचे टँकर्स, तसेच टँकर्स भरण्याची ठिकाणे यांच्या संख्येनुसार आवश्यक त्या परिवहन निरीक्षकांची संख्या निश्चित केली जाईल.
- एसओपीमध्ये गरजेनुसार स्थानिक स्तरावर छोटे बदल करण्यात येणार आहेत.

मुंबईतील विहिरी आणि कूपनलिका तसेच खासगी पाणीपुरवठा करणारे टँकर्स अधिग्रहित करण्याचा निर्णय घेतला आहे. खासगी गृहनिर्माण संस्था (सोसायटी) यांच्यासह संबंधित घटकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरळीतपणे करण्यासाठी महानगरपालिकेने प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) देखील निश्चित केली आहे.

महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार, विहीर व कूपनलिकाधारकांना बजावलेल्या नोटिशींना १५ जून २०२५ पर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. फडणवीस आणि चंद्रकांत पाटील यांनीही यासंदर्भात आवश्यक निर्देश दिले होते. 'ना-हरकत प्रमाणपत्र' मिळवण्याच्या प्रक्रियेस सुलभ करण्यासाठी 'भू-नीर' प्रणाली अधिक कार्यक्षम करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, टँकरचालकांनी चार दिवसांनंतरही संप मागे घेतलेला नसल्याने, वाढत्या उन्हाळ्यात पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन महापालिकेने हा निर्णय घेतला आहे.

आपत्कालीन व्यवस्थापन कायद्यातील कलम ३४(अ) आणि ६५(१) अंतर्गत महापालिकेला विहिरी, कूपनलिका आणि खासगी टँकर्स अधिग्रहित करण्याचा अधिकार प्राप्त आहे. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे मुंबईतील नागरिकांचा पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे. नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## गडचिरोलीमधील नक्षलवाद संपवण्यासाठी नितीन गडकरींनी सांगितला 'मेगा प्लॅन'

**■मुंबई। प्रतिनिधी :**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी गडचिरोलीमधील नक्षलवाद संपवण्यासाठी मेगा प्लॅन सांगितला. मुंबईत आयोजित कार्यक्रमात गडचिरोलीसाठी राज्य शासन आणि केंद्र शासनाचे सुरु असलेले उपक्रम गडकरी यांनी सांगितले. गडकरी म्हणाले, गडचिरोली येथून एक रस्ता काढायचे आहे. जो थेट विशाखापट्टणम पोर्टला जोडला जाईल. रायपूर ते विशाखापट्टणम एक एक्सप्रेस बांधत आहोत. रस्ते झाले की त्या भागाचा विकास होतो. चित्र बदलते. दावोस येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीसाठी गुंतवणूक आणली आहे. साडेसहा लाख कोटी रुपयाची गुंतवणूक या भागांत येत आहे. यामुळे जगातील सगळ्यात चांगले लोखंड या ठिकाणी तयार होईल. या प्रकल्पात ८० टक्के स्थानिक मुलांना काम मिळावे, असे सांगितले असल्याचे नितीन गडकरी यांनी सांगितले.

29 वर्षांपूर्वी गडचिरोलीत असलेल्या नक्षलवादाची आठवण गडकरी यांनी सांगितले. गडचिरोली हे नक्षलवादी गाव म्हणून ओळखले जात होते. परिस्थिती अत्यंत बिकट होती. मी निवडणुकीसाठी तेथील एका भागात प्रचारासाठी गेली होतो. त्यावेळी पोलिसांनी मला घेरले. चहा पिण्यासाठी पण पोलिसांनी तंबू दिला नाही. परंतु आज परिस्थिती पूर्ण बदलली आहे. आज या ठिकाणी १२०० शिक्षक आहेत. ३० हजार विद्यार्थी शिकत आहेत. आता ३० हजार विद्यार्थी संख्या १ लाख करायची आहे, असा संकल्प गडकरी यांनी जाहीर केला.



गडचिरोलीमध्ये होत असलेल्या बदलाबाबत नितीन गडकरी म्हणाले, या भागात असलेल्या नक्षलवाद्यांना मी देखील भेटलो होतो. त्यांची समजावले होते. त्यांना काम दिले. काम मिळाल्याने तीन हजार नक्षलवादी कामाला लागले. त्यांनी नक्षल अँक्टिव्हिटी त्यांनी सोडल्या. जल, जंगल यातून कसा विकास होईल यासाठी प्रयत्न करत आहोत. मी राजकारण करतच नाही. ९० टक्के हेच समाजकारण करतो. गडचिरोलीला ५०० विद्यार्थ्यांसाठी हॉस्टेल बांधणार आहे.

## मुंबईकरांचा प्रवास होणार गारेगार

**■मुंबई। प्रतिनिधी :**

लाखो मुंबईकरांसाठी लोकल प्रवास नित्याचा आहे. लोकलमधील गर्दीत उन्हाळ्यात घामाघूम होत मुंबईकर घर ते कार्यालयात दाखल होत असतात. परंतु वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या मुंबईकरांचा लोकल प्रवास आता अधिक गारेगार होणार आहे. मध्य रेल्वेने याबाबत महत्वाचा निर्णय घेतला आहे. वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेवर बुधवारपासून ८० वातानुकूलित लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहे. त्याचा फायदा हजारो मुंबईकरांना होणार आहे. त्यांचा प्रवास सुखद अन् गारेगार होणार आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर वाढीव १४ वातानुकूलित लोकल सुरू करण्यात येणार आहे. यामुळे १६ एप्रिलनंतर वातानुकूलित लोकल फेऱ्यांची संख्या ६६ वरून ८० होणार आहे. वाढत्या उष्ण वातावरणात प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी मध्य रेल्वेने ही सुविधा सुरू केली आहे. मध्य रेल्वेने एसी लोकल फेऱ्या वाढवल्या असल्या तरी पश्चिम रेल्वेने अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. सध्या मध्य रेल्वेच्या मुख्य मार्ग, हार्बर मार्ग, ट्रान्स-हार्बर मार्ग आणि बेलापूर-उरण कॉरिडॉर, नेरूळ-उरण पोर्ट मार्गिकेवरून सुमारे दररोज १,८१० लोकल फेऱ्या धावतात. त्यात कोणतीही वाढ केली नाही. परंतु १४ सामान्य लोकलच्या वेळेत वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहे. या वातानुकूलित लोकल फेऱ्या सोमवार ते शनिवारपर्यंत धावतील. रविवार आणि सुट्टीच्या दिवशी वातानुकूलितऐवजी सामान्य लोकल धावणार आहेत.

## राज्यात २ दिवस अवकाळी पावसाचा आयएमडीचा इशारा... अनेक भागात गारपीट

**■मुंबई। प्रतिनिधी :**

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट सुरूच आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पाऊस सुरूच आहे, तर काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट सुरूच आहे. दुसरीकडे, अवकाळी पावसासाठी अनुकूल वातावरण देखील निर्माण झाले आहे. हवामान खात्याने अनेक भागात पावसाचा इशारा दिला आहे. तसेच अनेक भागात गारपीट होत आहे. दरम्यान, मुंबईत पावसाळी वातावरण आले आहे आणि पुढील एक-दोन दिवस पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भातील काही भागात अजूनही उष्णतेची लाट सुरू आहे.

आता राज्याच्या अनेक भागात पावसाची शक्यता आहे, ज्यामुळे उष्णतेपासून आराम मिळू शकेल. पश्चिम-मध्य बंगालच्या उपसागरावरील सक्रिय कमी दाबाचे क्षेत्र संपले आहे. राजस्थानच्या पश्चिमेकडून विदर्भाच्या उत्तरेकडे कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राज्यात पावसासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाची प्रक्रिया देखील वाढली आहे. यामुळे राज्याच्या काही भागात हलका पाऊस पडत आहे.



## 'वाल्मिकच्या एन्काऊंटरची मला सुपारी आलेली, राज्यातील अनेक...'

## बीड पोलीस अधिकाऱ्याच्या दाव्याने खळबळ

**■बीड। प्रतिनिधी :**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामध्ये अटकेत असलेला प्रमुख आरोपी वाल्मिक कराडसंदर्भात एक धक्कादायक खुलासा एका माजी निलंबित पोलीस अधिकाऱ्याने केला आहे. वाल्मिक कराड याचा एन्काऊंटर करण्याची मला सुपारी आली होती, असं या निलंबित अधिकाऱ्याने म्हटलं आहे. या दाव्यामुळे एकच खळबळ उडाली असून राज्यात अनेक एन्काऊंटर बोगस होते असंही म्हटलं आहे.

**कोणी केला आहे हा दावा?**

समोर आलेल्या माहितीनुसार, वाल्मिकच्या एन्काऊंटरची सुपारी मिळाल्याचा दावा करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याचं नाव रणजीत कासले असं आहे. कासले हे पोलीस उपनिरीक्षक असून सध्या निलंबित आहेत. परळी नगर परिषदेचे गटनेते म्हणून कार्यरत राहिलेल्या वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्याची सुपारी मला देण्यात आली होती, असं कासलेने म्हटलं आहे. कासलेने आपल्या फेसबुक अकाऊंटवरुन एक व्हिडीओ शेअर करत हा धक्कादायक दावा केला आहे. तसेच इतक्यावर न थांबता कासलेने, ''राज्यातील अनेक एन्काऊंटर बोगस होते'', असा दावाही कासलेने केला आहे.



### हा अधिकारी निलंबित का?

आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचा ठपका ठेवत कासलेंना निलंबित करण्यात आलं आहे. तसेच कासले यांनी यापूर्वीही अनेकदा असे वादग्रस्त व्हिडीओ पोस्ट केल्याचं दिसून आल्याने त्यांच्यावर आधीही पोलीस खात्याकडून कारवाई करण्यात आलेली. वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरबद्दल कसलेने आपल्या फेसबुक अकाऊंटवरुन व्हिडिओ प्रसारित केल्याने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

वाल्मिक म्हणतो या प्रकरणाशी संबंध नाही

बीड जिल्हा न्यायालयामध्ये सुरु असलेल्या संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणामध्ये वाल्मिक कराडने धक्कादायक दावा नुकत्याच झालेल्या सुनावणीदरम्यान केला. आरोपी वाल्मीक कराडने बीड न्यायालयात खटल्यातून वगळण्याचा म्हणजेच डिस्चार्ज आपलिकेशन दाखल केला आहे. ''या प्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही, मला या खटल्यातून वगळावं,'' असा थेट दावा करत आरोपीने न्यायालयात अर्ज दाखल केला. त्यावर विशेष सरकारी वकील उज्जवल निकम यांनी कडाडून विरोध करत, ''शिवनीती वापरून वाल्मीकरांचा डाव उधळून लावला'' असं पत्रकारांशी बोलताना सांगितलं. १० एप्रिल रोजी पत्रकारांशी बोलताना उज्जवल निकम यांनी, ''आज पार पडलेल्या सुनावणीत आरोपीच्या वकिलाने डिस्चार्ज अर्ज मांडला. मात्र सरकार पक्षाने वेळ मागितली. आता या अर्जावर पुढील सुनावणी २४ एप्रिल रोजी होणार आहे,'' असं सांगितलं.

वाल्मिक कराड हा अजित पवारांच्या पक्षातील नेते धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्याने या प्रकरणावरुन मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.

## नागपुरातील डॉक्टरचे भयानक कृत्य पाहून पोलिसही हादरले

**■नागपुर। प्रतिनिधी :**

नागपुरात एक अत्यंत धक्कादायक घटना घडली. एका डॉक्टरने भावाच्या मदतीने आपल्या पत्नीची हत्या केली आहे. पोलिस तपासात हत्येमागे अत्यंत धक्कादायक कारण उघडकीस आले आहे. पत्नीची हत्या का केली? डॉक्टरने हत्येची कबुली देताना जे कारण सांगितले ऐकून पोलिसही हादरले आहेत.

नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक डॉक्टर अर्चना राहुले(५० वर्ष) यांची हत्या त्यांच्या पतीने भावाच्या मदतीने केल्याची धक्कादायक माहिती तपासात उघडकिस आली

डॉ अनिल राहुले(५२ वर्ष) यांनी भाऊ राजू(५९ वर्ष) अशी आरोपींची नावे आहेत. सोबत मिळून कट रचून त्यांनी डॉक्टर अर्चना राहुले यांची हत्या केली. डॉ अनिल यांनी भावाच्या मदतीने रॉडने वार करून डॉक्टर पत्नीचा खून केला. हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लाडीकर लेआऊट येथे ही हत्येची घटना घडली. या प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी दोघांना अटक केलीय.



डॉ अर्चना या नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात फिजिओथेरपि विभागात साहाय्यक प्राध्यापक होत्या. तर त्यांचे पती अनिल छत्तीसगड येथील रायपूर येथे मेडिकल इन्स्टिट्यूट मध्ये प्राध्यापक आहे . त्यांचा मुलगा तेलंगणा येथे एमबीबीएसच्या तृतीय वषार्ला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार डॉ अनिल अर्चनाच्य चारित्र्यावर संशय घ्यायचा. यावरून अर्चना आणि अनिल यांच्यातील वाद विकोपाला गेला होता.

यातूनच अनिलने आपल्या भाऊ राजूच्या मदतीने अर्चनाच्या हत्येचा कट रचला. ९ एप्रिलला अनिल भावासह घरी आला. त्या दोघांनी रॉडने अर्चनाच्या डोक्यावर वार करत हत्या केली आणि घराला लॉक लावून तेथून पसार झाले आणि १३ तारखेला रात्री घरी परत आले. जणू आपल्याला काही माहिती नसल्याचे बनाव करत अर्चनाचा मृतदेह पाहून रडायला सुरुवात केली. दरम्यान पोलिसांनी तपास सुरू केल्यानंतर त्यांना पती अनिल वर संशय आला पोलिसांनी चौकशी केल्यानंतर अनिल ने भावाच्या मदतीने पत्नीचा खून केल्याचे उघडकीस आले.

## मोबाईल चोरून 'असा' मारला जातोय बँक खात्यावर डल्ला!

## तुमच्या स्मार्टफोनवर सायबर गुन्हेगारांचा डोळा




**■नाशिक। प्रतिनिधी :**

तुम्ही मोबाईल हॅक करून पैसे चोरण्याची घटना ऐकली असेल किंवा तुमचा ओटीपी मागून पैसे अपहार केल्याची घटना देखील वाचली असेल. मात्र नाशिकमध्ये एक वेगळीच घटना घडली आहे.नाशिक मध्ये राहणा-या एका कंत्राटदाराचा मोबाईल चोरून त्याच्या अकाउंट वरून तब्बल साडेतीन कोटी रुपये चोरल्याची घटना घडली आहे.

आर्थिक फसवणुकीतून वाचायचं असेल तर तुम्हाला कोणताही फोन आला किंवा मेसेज आला किंवा कुणी ओटीपी मागितला तर त्यावर विश्वास ठेवू नका असं आवाहन अनेकदा करण्यात आलंय. मात्र आता तुम्हाला तुमचा स्मार्टफोनही सांभाळून ठेवावा लागणार आहे. कारण सायबर गुन्हेगारांचा आता तुमच्या फोनवर डोळा आहे. मोबाईल हॅक करून नाही तर मोबाईल चोरून या सायबर भामट्यांनी नाशिकमधील एका कंत्राटदाराला साडेतीन कोटींचा गंडा घातलाय. कुरिअर देण्यासाठी ओटीपी पाहण्याच्या बहाण्याने हेल्मेट घातलेले दोन जण कंत्राटदाराजवळ आले. आणि त्याचा फोन घेऊन पसार झाले. आणि अवघ्या काही तासात कंत्राटदाराचं अकाऊंट रिकामं झालं.

सायबर पोलिसांच्या मदतीने कंत्राटदाराच्या बँक खात्यावरील सर्व व्यवहार तत्काळ थांबवण्यात आले. तपासामध्ये कंत्राटदाराच्या खात्यावरून धुळ्यातील एका व्यक्तीच्या बँक खात्यात पैसे जमा झाल्याची माहिती मिळाली धुळे पोलिसांच्या मदतीने खातेधारकाला शोधण्यात आलं. ४८ तासात कंत्राटदाराला त्याचे पैसे परत मिळाले. ज्या खातेधारकाच्या खात्यावर पैसे जमा झाले त्याने हे पैसे जमीन व्यवहाराचे असल्याचं सांगितलं. त्यामुळे त्याच्यासोबत व्यवहार करणा-या व्यक्तींचा शोध घेतला जातोय.

अद्याप हे सायबर भामटे पोलिसांच्या हाती लागू शकले नाहीयेत. आपले सगळे पैसे परत मिळाल्याने कंत्राटदाराने सुटकेचा निश्वास सोडला असला तरी या प्रकारामुळे नाशिकमध्ये खळबळ

## तडीपार गुंडाकडून धावत्या बसला रिक्षा आडवी घालत नग्न होऊन महिलेचा विनयभंग, बसच्या काचाही फोडल्या

**■मुंबई। प्रतिनिधी :**

नाशिकमधून एक संतापजनक बातमी समोर येत आहे. रिक्षा चालकाने भररस्त्यात नग्न होत अश्लील हावभाव करत महिलेचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. संशयित आरोपी सराईत गुन्हेगार असून तो शहरातून तडीपार असल्याची माहिती समोर आली आहे. महिलेच्या तक्रारीनंतर नाशिकच्या मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित रिक्षाचालक मिजान रजा ऊर्फ मल्ला सादिक शेख याला मुंबई नाका पोलिसांनी अटक केली आहे.




### संशयित आरोपी तडीपार

त्याने सिटीलिंक बस चालक आणि वाहकाला देखील मारहाण केली. तसेच बसवर दगड फेकत बसच्या काचादेखील फोडल्या. यानंतर घाबरलेल्या प्रवाशांनी पोलिसांना फोन केला. काही वेळातच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि संशयित आरोपींना ताब्यात घेतले. संशयित रिक्षाचालक मिजान रजा ऊर्फ मल्ला सादिक शेख हा भद्रकाली, जुने नाशिक या परिसरात राहणारा आहे. यापूर्वी त्याच्यावर एक दरोड्याचा गुन्हा दाखल आहे. १६ ऑगस्ट रोजी दंगलीतील तो आरोपी आहे. त्याला शहरातून तडीपार करण्यात आलेले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. तसेच संशयित आरोपीकडे असलेली रिक्षा पोलिसांनी जप्त केली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोधले नगर परिसरातून सिटीलिंकची बस येताना ती अचानक बंद पडली. यामुळे बसमधील प्रवासी दुसऱ्या बसची वाट पाहत खाली उतरले. त्यावेळी एक रिक्षाचालक प्रवाशांना घेऊन जाण्यासाठी विचारणा करण्यासाठी आला होता. त्याने फियार्दी महिलेला विचारले की, तुमको किधर जाना है, यावेळी महिलेने रिक्षा चालकाला नकार दिला. यानंतर महिला बसची वाट बघत असता संशयिताने तुमको किधर जाना है, असे म्हणत हाताने अश्लील इशारे केले.

**नग्न होत अश्लील हावभाव करत केला महिलेचा विनयभंग**

यानंतर महिला घाबरून गेली होती. काही वेळाने सिटीलिंकची बस तेथे आल्याने प्रवासी बसमध्ये बसले. बस द्वारकेच्या दिशेने निघाली असता रिक्षाचालक तिचा पाठलाग करत आहे, असे महिलेला जाणवले. द्वारका सर्कल येथे सिटीलिंक बस आली असता रिक्षाचालक आणि त्याच्या मित्राने रिक्षा बसला आडवी लावली. यानंतर रिक्षाचालकाने कपडे काढून तो नग्न झाला.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# या निमित्ताने बरेच काही

भारताच्या संसदेत वादळी चर्चा होऊन वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झाले आणि राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने त्याचे कायद्यात रुपांतर करण्यात आले. हे धेयक संसदेत मांडण्याआधी आणि ते मंजूर झाल्यानंतर बऱ्याच मुस्लीम संघटना आणि त्यांचे नेते त्याविरोधात आंदोलने करत आहेत. स्वतःला नव्या पिढीतील मुस्लिमांचे नेते म्हणवणारे आणि धार्मिक पोषाख करणारे एमआयएम पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी तर आक्रमक भाषण करून सभागृह दणाणूत टाकताना या विधेयकाची प्रत फाडून टाकली. भारतामध्ये एका अल्पसंख्याक गटाच्या नेत्याला लोकसभेत असे करण्याचे स्वांतत्र्य आहे, हे या देशातील लोकशाहीचे स्वातंत्र्य म्हणावे की दुर्बलता हाही एक विचार करण्यासारखा मुद्दा आहे. पूर्वीपासून विचार केला तर असे दिसेल की, मुसलमान या देशात अल्पसंख्याक असले, तरी त्यांनी इथल्या बहुसंख्याक हिंदूवर आपला वचक ठेवलेला आहे. इथल्या अल्पसंख्याक असलेल्या मुसलमानांनी भारताची फाळणी करून घेतली आणि त्यांना हवा असलेला पाकिस्तान नावाचा एक वेगळा इस्लामिक देश तयार केला. त्यांच्या मागणीपुढे इथल्या बहुसंख्याक हिंदूंच्या नेत्यांचे काहीही चालू शकले नाही. इथला मुस्लीम समाज आणि त्यांचे नेते हे दोन्ही गोष्टीचा फायदा घेताना दिसतात, एका बाजूला म्हणतात की, भारतीय संविधानाने आम्हाला इथले नागरिक म्हणून अधिकार दिलेले आहेत, त्याचा आम्ही उपयोग करणार, दुसऱ्या बाजूला मुस्लीम पर्सनल लॉ बोर्ड, वक्फ बोर्ड, मदरसा, कुटुंब नियोजन यांना तुम्ही हात लावायचा नाही, त्या आमच्या धार्मिक गोष्टी आहेत. म्हणजे या देशातील इतर धर्मियांना जे कायदे कानू लागू होतात, ते आम्हाला लागू होणार नाहीत, कारण आम्हाला भारताच्या संविधानाने स्वातंत्र्य दिलेले आहे. त्यामुळे भारतात राहणाऱ्या मुस्लिमांपुढे भारतीय कायदेही अनेकदा हतबल होताना दिसतात. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिहेरी तलाक हा मुस्लीम महिलांसाठी जाचक ठरणारा प्रकार रद्द करण्यासाठी कायदा आणला तेव्हा मोठ्या संख्येने मुस्लिमांनी रस्त्यावर उतरून त्याचा विरोध केला. त्यात महिलांचाही समावेश होता. यापूर्वी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी शहाबानो या तलाकपीडित महिलेला तिच्या नर्वयाने पोटगी देण्याचा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय संसदेतील आपल्या पक्षाचे बहुमत वापरून रद्द केला, तर आज परिस्थिती अशी आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याकडील बहुमताचा वापर करून असे जाचक प्रकार रद्द केले. पण हे रद्द करताना त्यांना मुसलमानांच्या संघटनांच्या विरोधाला सामोरे जावे लागले, त्या विरोधालाच घाबरून राजीव गांधी यांनी तलाकपीडित महिलांना पोटगी देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय स्थगित केला. जेव्हा मोदी सरकारने एनआरसी आणि सीएए आणला तेव्हा मुसलमानांनी दिल्लीतील शाहीन बाग येथे आंदोलन सुरू केले. आम्ही देशभरात ठिकठिकाणी शाहीन बाग करू असा इशारा देण्यात आला. अगदी महाराष्ट्रातही तेच झाले, पण त्यांना अशा आंदोलनासाठी केवळ आझाद मैदानात परवानगी देण्यात आली. या कायद्यामुळे जे मुस्लीम बाहेरच्या देशातून येऊन या देशात अनधिकृतपणे राहत आहेत, त्यांच्यावर कारवाई करून त्यांना परत पाठवण्यात येणार आहे, त्यासाठी इथले नागरिक असणाऱ्या मुसलमानांना चिंता करण्याचे काही कारण नव्हते, पण त्या कायद्याविरोधात मोठा जनक्षोभ उसळविण्यात आला. वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या चर्चेच्या वेळी विधेयकाची प्रत फाडणाऱ्या असदुद्दीन ओवेसी यांना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट शब्दात सुनावले की, या देशाचे कायदे तुम्हाला मान्य करावे लागतील. याच असदुद्दीन ओवोसी यांनी मागे भारतामध्ये मुसलमानांचाही हिस्सा आहे, असे म्हटले होते. त्यावेळी भाजपचे नेते माधव भांडरी यांनी त्यांना सांगितले होते की, 'मुसलमानांचा जो हिस्सा होता तो, १९४७ ला त्यांना दिलेला आहे. त्यानंतर जे मुसलमान भारतात स्वखुशीने राहिले त्यांना इथल्या कायद्याप्रमाणे इथे रहावे लागेल'. भारतात राहणाऱ्या अनेक मुसलमानांना बदलत्या काळानुसार आपल्यात बदल केले पाहिजेत हे पटतही असेल, पण भारतात आपले वेगळेपण राखण्यासाठी नव्या बदलांना ते विरोध करत असतील तर त्यांनी ते थांबवायला हवे, कारण सुधारणांना विरोध केल्यामुळे त्यांचे दूरगामी नुकसान होईल. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून प्रेरणा घेऊन बौद्ध समाजाने शिक्षणावर भर दिला आहे, त्यांनी नव्या सुधारणांचा स्वीकार केला आहे. त्यामुळे विविध क्षेत्रात त्यांनी मोठी मजल मारलेली दिसत आहे. शिक्षण आणि सामाजिक सुधारणांचा स्वीकार करणारा समाज पुढे जात असतो, हे सगळ्यांनी लक्षात घ्यायला हवे, त्यात मुस्लीम समाजाने मागे राहून चालणार नाही. भारतातील काही राजकीय पक्षांकडून मुस्लिमांच्या धार्मिक भावना गोंजारून त्यांचा राजकीय मतपेटी म्हणून वापर करण्यात आलेला आहे. त्याचा फायदा वरच्या वर्गातील मुसलमानांनी मोठ्या प्रमाणात उठवला, पण तळागाळात असलेला मुसलमान समाज हा विकासापासून वंचित राहिला आहे. वक्फ बोर्डावरही काही ठरावीक मुस्लीम वर्गाची मक्तेदारी आहे. गरीब मुसलमानांना त्याचा काही उपयोग होत नाही. पण ही समानता आणण्यासाठीही स्वतंत्र भारतात सत्ताधार्यांना मोठा संघर्ष करावा लागत आहे, याला काय म्हणावे?

# आरक्षणाऐवजी सामाजिक न्याय



मुस्लिम समाजाचे लांगुलचालन होते' या एका आरोपाभोवती गेली शंभर-दीडशे वर्षे भारताचे राजकारण फिरत आहे; पण २००६च्या सच्चर समितीच्या अहवालाने हा आरोप खोटा आहे, हे सप्रमाण सांगितले आहे. 'भारतात मुस्लिम समाजाची स्थिती अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीपेक्षा वरची, पण हिंदू ओबीसीपेक्षा पुष्कळ खालची आहे,' असे निरीक्षण समितीने नोंदवले आहे.

या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी समितीने काही उपाययोजना सुचवल्या होत्या व त्यावर सरकारने काही पावले उचलली होती. आज हा विषय परत चर्चेला येण्याचे कारण म्हणजे 'सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च, नवी दिल्ली' यांनी प्रसिद्ध केलेला फेब्रुवारी २०२५मधील अहवाल, 'रीथिंकिंग ॲफरमेटिव्ह ॲक्शन फॉर मुस्लिम इन कॉन्टेंपररी इंडिया' हा अहवाल प्राध्यापक व संशोधक हिलाल अहमद, मोहमद संजीर आलम व नझिरा परवीन यांनी तयार केला आहे. या अहवालाचे वैशिष्ट्य असे, की मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक मागासलेपणाची चर्चा त्यांनी १९९०नंतरच्या नव्या आर्थिक धोरणाच्या व सध्या बदलत चाललेल्या राजकीय पर्यावरणाच्या पार्श्वभूमीवर केली आहे. त्यांनी अशी भूमिका घेतली आहे, की मुस्लिम समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षणापेक्षा सामाजिक न्यायाची मागणी उपयुक्त ठरेल!

मुस्लिम मुलांचे शाळेत भरती होण्याचे प्रमाण वाढले आहे; पण त्यांचे शाळेच्या वरच्या टप्प्यात जाण्याचे प्रमाण घटले आहे. उच्च शिक्षणात व व्यवसाय शिक्षणात मुस्लिम विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी आहे. खासगी शिक्षण संस्थेत शिकण्याचे मुस्लिमांचे प्रमाण कमी आहे. इतर धार्मिक घटकांच्या तुलनेत मुस्लिम समाज शिक्षणात मागे आहे. जे प्रदेश, प्रांत प्रगत आहेत तेथे मुस्लिमांच्या शिक्षणाची प्रगती झालेली आहे, असे अहवाल म्हणतो. नव्या जागतिकीकरणाच्या आर्थिक पर्यावरणात, रोजगाराच्या संधीत बदल झाले आहेत, पण मुस्लिम समाजाच्या रोजगार परिस्थितीत फारसे बदल झालेले नाहीत. उपभोग खर्च व संपत्तीची मालकी या निकषावर मुस्लिम समाजाचे स्थान अनुसूचित जाती-जमातींपेक्षा वर, पण वरिष्ठ हिंदू जातीपेक्षा पुष्कळ खाली आहे. फार थोड्या पांढरपेशा नोकऱ्या मुस्लिमांना मिळत आहेत. एकूण 'सच्चर'नंतर मुस्लिम समाजाच्या परिस्थितीत फार फरक पडलेला नाही, असे अहवालाने म्हटले आहे.

### आरक्षणाची मागणी

मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची मागणी आजही केली जात आहे; पण मुस्लिमांसाठी सरसकट आरक्षण असू नये, असे अहवालाने म्हटले आहे. धार्मिक निकषावर आरक्षण देणे राज्य घटनेच्या चौकटीत शक्य होणार नाही. तसेच एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त देता येत नाही, त्यामुळे त्याला संविधानिक व कायदेशीर अडथळे आहेत. सरसकट आरक्षणामुळे गरजूंना फायदा न मिळता गरजू नसलेले फायदा घेतात, म्हणून असे आरक्षण न ठेवता ह्यसेक्युलर आरक्षणाचे धोरण' असावे असे अहवालाने म्हटले आहे. आरक्षणाचे धोरण 'धर्मनिरपेक्ष' करण्याचा पहिला प्रयत्न मंडल आयोगाने केला. मंडल आयोगाने इतर मागासवर्ग गटात 'हिंदू व मुस्लिम' जातीचा समावेश केला आहे. अहवाल म्हणतो की, मुस्लिम समाजात ७५ टक्के समाज हा इतर मागासवर्गीय आहे. मुस्लिम समाजातील इतर अनेक जातींना आरक्षणाच्या कक्षेत आणता येईल. केरळ, कर्नाटक, पश्चिम बंगाल या राज्यांत काही नव्या जाती इतर मागासवर्गीय गटात समाविष्ट करून मुस्लिमांना 'सबकोटा' दिला आहे. अ.जा. मध्ये हिंदू अस्पृश्य जातींचा समावेश होतो व त्यांना संविधानाने आरक्षण दिले आहे. नंतर दलित शीख व बुद्धिस्ट यांना अ.जा.चे आरक्षण मिळाले. पूर्वी अनेक हिंदू अस्पृश्यांनी हिंदू धर्मातील जाचाला कंटाळून धर्मांतर केले व मुस्लिम किंवा ख्रिश्चन धर्म स्वीकारला. पण त्याची सामाजिक प्रतिष्ठा वाढली नाही व ते दलित मुस्लिम व दलित ख्रिश्चन झाले. अशांना अ.जा.च्या गटात समाविष्ट करून आरक्षणाचा लाभ द्यावा, असे अहवालाने म्हटले आहे. बिहारमधील 'पसमंदा मुस्लिमां'ची हीच मागणी केली ३०-३५ वर्षे चालू आहे! स्वतंत्र सरसकट आरक्षणाऐवजी, अजलफ (इमाव) अरझल (अ.जा. व अ.ज.) या गरजूंना सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाच्या कक्षेत आणले तर नेमक्या गरजूंना त्याचा लाभ मिळेल व कोणत्या संविधानिक समस्या निर्माण होणार नाहीत, असे अहवाल म्हणतो.

### सामाजिक न्याय

या अहवालाचा भर सामाजिक न्यायाच्या मागणीवर आहे. सामाजिक न्याय म्हणजे समाजातील प्रत्येक घटकाला समान, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क व संधी मिळणे होय! त्यासाठी अहवालाने विविध सूचना केल्या आहेत. मुस्लिम समाज प्रामुख्याने घरगुती उद्योग व कारागिरी व्यवसाय यात गुंतलेला आहे. उदा. सुतारकाम, विणकाम, गालिचे तयार करणे व धातू उद्योग, अत्तरे व सुगंधी द्रव्य तयार करणे, लेदर काम, बेकरी उत्पादने, वर्कशॉप इ. या व्यवसायांचे प्रशिक्षण, कच्च्या मालाची उपलब्धता, नवे तंत्रज्ञान, भांडवल इ. प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. सर्वच अल्पसंख्याकांसाठी 'समान संधी उपयोग' स्थापन करण्याची मागणी अहवालात केली आहे. नव्या आर्थिक धोरणामुळे खासगी क्षेत्राचे महत्त्व वाढत आहे. म्हणून अहवालाने खासगी क्षेत्राकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. उदा. खासगी क्षेत्राने मुस्लिम मुलांना गुणवत्तेच्या आधारे नोकऱ्या द्याव्यात, मुस्लिम मुलांच्या उच्च शिक्षणासाठी तसेच कौशल्य विकासासाठी 'सीएसआर'मधून आर्थिक मदत करावी, कंत्राटे देण्यात विविधता पाळावी असेही अहवाल म्हणतो. मुस्लिमेतर स्वयंसेवी संस्था, मुस्लिम संस्थांबरोबर काम करायला उत्सुक नसतात. हे बदलणे आवश्यक आहे.

तसेच मुस्लिमबहुल जिल्हे, तालुके यात पायाभूत सोयींचा विकास झाला पाहिजे. त्यासाठी भाजपचे सरकार 'समूहकेंद्रित धोरण' ऐवजी 'प्रांत केंद्रित धोरण' आखत आहे. मागास जिल्हे म्हणण्याऐवजी 'विकासाची आकांक्षा असणारे जिल्हे' असा नवा शब्दप्रयोग वापरला जात आहे व या प्रांतांच्या विकासामध्ये सर्वांचा विकास होतो. त्याचा काही लाभ मुस्लिमांना मिळाला आहे, असे निरीक्षण अहवालाने नोंदवले आहे. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय धार्मिक स्वातंत्र्य अहवाल २०२४नुसार धार्मिक स्वातंत्र्याच्या संदर्भात भारत हा 'विशेष चिंतेचा देश' आहे, असे म्हटले आहे. भारत सरकारने हा अहवाल फेटाळला असला तरी भारतात मुस्लिम द्वेषाचा ज्वर वाढत आहे. सत्ताधारी पक्ष व संघटना त्यात भर घालत आहेत व त्यामुळे मुस्लिम समाजात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असताना सरकारी धोरणे ही 'फेस व्हॅल्यू'वर घेऊन व सद्य परिस्थितीबद्दल कोणतीही नाराजी व्यक्त न करता हा अहवाल तयार केला आहे. या त्यांच्या 'भाबडेपणाबद्दल', 'सकारात्मकतेबद्दल', 'चांगुलपणाबद्दल' अहवाल तयार करणाऱ्याचे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे! अहवालातील शिफारशी या पालथ्या घड्यावर पाणी असणार आहेत; पण अहवालात काही मुद्द्यांची स्पष्ट चर्चा केली आहे, ही बाब महत्त्वाची आहे.

## पाणथळ परिसंस्था धोक्यात




'जल ही जीवन' असे आपण म्हणतो खरे; पण जलीय परिसंस्थांची आजची स्थिती नेमकी आहे तरी कशी? याचा कुणी फारसा विचार करत नाही. स्वच्छतेचे इव्हेंट, त्यांचे अहवाल, प्रकल्प, मोहिमा आणि त्यांचे उदात्तीकरण मात्र पाहायला मिळते. प्रकल्पांचा आणि वाढत्या शहरीकरणाचा विळखा आणि विकास प्रकल्पांवर चर्चा व कायदेशीर लढाई यांपुढे हे फारसे प्रभावी ठरलेले नाही. रोहित पक्ष्यांचा अधिवास असलेल्या जायकवाडी (नाथसागर) प्रकल्पाच्या १५ हजार हेक्टर क्षेत्रावरील प्रस्तावित सौरऊर्जा प्रकल्प हे ताजेच उदाहरण. याने केवळ स्थानिक मासेमारच प्रभावित होणार नाहीत, तर रोहित पक्ष्यासकट लाखो पाणपक्षीदेखील संकटात येणार आहेत. केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या २०१९चे पहिले सर्वेक्षण व २०२३च्या अहवालानुसार, महाराष्ट्रात एकूण ५७४ नैसर्गिक व ९६ हजार ४८८ कृत्रिम लहान-मोठ्या जलीय परिसंस्था आहेत. यातील ९६ हजार ३४३ या ग्रामीण भागात, तर ७१९ या शहरी भागात आहेत. संपूर्ण भारताचा विचार करता, ग्रामीण भागात २३ लाख ५५ हजार ५५, तर शहरी भागात ६९ हजार ४८५ जलीय परिसंस्था आहेत. यामध्ये ६० टक्के तलाव, १६ टक्के लहान तलाव, १२ टक्के सिंचन तलाव, तर १२ टक्के हे जलसंवर्धन तलाव आहेत. या सर्व परिसंस्थांचा दर्जा कसा आहे, हा संशोधनाचा विषय आहे. जलीय परिसंस्था कार्बन डाय ऑक्साइडचे प्रमाण कमी करून ऑक्सिजन तयार करतात. पाण्याचे संतुलन राखतात. म्हणून त्या पर्यावरणासाठी अत्यावश्यक आहेत. प्रदूषण, अतिउपसा, अधिवास अवनती इत्यादींमुळे जलीय परिसंस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. यामध्ये ९० टक्के क्षेत्र प्रभावित झालेले आहेत. यापैकी ७० टक्के भाग हा अति जास्त प्रमाणात प्रदूषित झाला आहे.

# ट्रम्प यांनी छेडलेल्या व्यापार युद्धात काय-काय होणार?

**जबर आयात शुल्क लागू करून डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरात व्यापार युद्ध छेडले आहे. पहिल्या तडाख्यात देशोदेशीचे शेअर बाजार सापडले आहेत. चीनने जोरदार प्रत्युत्तर देऊन रणशिंग फुंकले आहे, तर भारतासह अनेक देश सावध पवित्र्यात आहेत. मंदी, बेरोजगारी, महागाईच्या टांगत्या तलवारीने जगभर चिंता आहे. व्यापार युद्धाने जगाच्या पुढ्यात काय-काय वाढून ठेवले आहे?**

अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार घेतल्यापासून जगभरात खळबळींचा सिलसिला सुरू आहे. जशास तसे कराचे (रेसिप्रोकल टॅक्स) अस्त्र प्रत्यक्ष उपसून ट्रम्प यांनी वैश्विक व्यापारावर मोठा आघात केला आहे. अनेक देशांनी जागतिक व्यापार संघटनेकडे धाव घेतली आहे. अमेरिकेला शिंगावर घेण्याची कुवत असलेल्या चीनने आक्रमक पवित्रा घेऊन व्यापार युद्धाला चाल दिली आहे. आगामी काळात महागाई वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. तसे झाले तर त्यापाठोपाठ मंदी आणि बेरोजगारी, गुन्हेगारी यांचाही ससेमिरा सुरू होणार आहे. संशोधक, अभ्यासक, तज्ज्ञ, जाणकार असे सर्वच बुचकळ्यात पडले आहेत. कुणालाही कसलाही अंदाज येत नाही. त्यामुळे सर्वसामान्य चिंताक्रांत होणे क्रमप्राप्तच आहे. या व्यापार युद्धामुळे काय काय परिणाम होऊ शकतील, याचा वेध घेणे आवश्यक आहे.

ज्या अमेरिकेने स्वतःच्या हितासाठी एवढा महाकाय निर्णय घेतला, तेथे लवकरच मोठे परिणाम दिसू लागतील. जसे की, चीनसारख्या देशातून अनेक सुटे भाग आणि अनेकविध वस्तू अमेरिकेच्या बाजारपेठेत विक्री होतात. त्यावर १०४ टक्के शुल्क लागू केल्याने या वस्तू अमेरिकेत प्रचंड महागतील. उदाहरण द्यायचे तर आयफोन किंवा टेस्ला कारचे अनेक सुटे भाग चीनमधून येतात, ते येणे बंद होईल. सहाजिकच आयफोन आणि टेस्ला या अमेरिकन कंपन्यांना जबर फटका बसेल. अशाच प्रकारे भारत, युरोप अशा विविध देशांमधून अमेरिकेत येणाऱ्या वस्तूंचा पुरवठा काही काळ मंदावेल आणि त्यातून महागाई वाढेल. ओघाने शेअर बाजारावर परिणाम होऊन मंदीची लाट सुरू होईल. डॉलर कमजोर होऊ लागल्याने तेथील अर्थव्यवस्थेला फटका बसेल. अनेकांच्या नोकऱ्या गेल्याने बेरोजगारी वाढेल. यातून मग गुन्हेगारीचा शिरकाव होईल. आताच ट्रम्प यांनी धडाधड शेकडो सरकारी कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला आहे. ट्रम्प यांच्या निर्णयसत्राविरोधात नागरिक रस्त्यावर येऊ लागले आहेत. व्यापार युद्धाच्या घोषणेमुळे ट्रम्प यांचे सहकारी आणि टेस्लाचे मालक एलन मस्क यांचेही डोके भंजाळून गेले आहे. कारण टेस्लाचे शेअर गडगडले आणि त्यांचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. येत्या काळात त्यांना आणखी नुकसान सहन करावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनीही ट्रम्प यांच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. तेथील मोठे उद्योजकही आता पुढे येऊन जबर शुल्काचा विरोध करू लागले आहेत. नजीकच्या काळात ट्रम्प यांनी या शुल्काचा फेरविचार किंवा ते मागे



घेतले नाही, तर त्यांचीच खुर्ची डळमळीत होऊ शकते. कारण, ज्या सिनेटरच्या पाठिंब्यावर ते अध्यक्ष बनले आहेत, तेच सिनेटर त्यांना विरोध करतील. रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी, सिनेटर हे सुद्धा ट्रम्प यांच्यावर टीका करतील. रिपब्लिकन पक्ष आणि ट्रम्प यांना देणगी देणारे भांडवलदारही नाराज होऊन त्यांची स्पष्ट मते व्यक्त करतील. त्यातच ट्रम्प यांच्याविरोधात सर्वोच्च आणि अन्य न्यायालयात अनेक खटले दाखल आहेत. त्यांचा निर्णयही अपेक्षित आहे. हे सारे घडून आले, तर ट्रम्प यांच्यावर महाभियोग प्रस्ताव दाखल होऊ शकतो. तो संमत होऊ शकतो.. किंवा त्यापूर्वीच ते राजीनामा देऊ शकतात. असे झाले, तर ते दुसरे अमेरिकन अध्यक्ष ठरतील.

भारताने शुल्कवाढीबाबत सावध पवित्रा घेऊन अमेरिकन व्यापार शिष्टमंडळाशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. काही वस्तूंवरील शुल्क कमी करण्याचे भारताने यापूर्वीच घोषित केले आहे. लवकरच अन्य वस्तूंबाबतही निर्णय अपेक्षित आहे. त्यामुळे अमेरिकेकडून भारताला सकारात्मक प्रतिसाद मिळू शकतो. पण तसे झाले नाही, तर युरोप, आखात, आफ्रिका आदी भागात नवीन बाजारपेठ शोधणे आणि तेथे भारतीय वस्तू, पदार्थांची निर्यात करणे हे अग्रक्रमाने करावे लागेल. त्यादृष्टीने भारताकडून प्रयत्न सुरू झाले आहेत; मात्र, काही महिन्यांचा कठीण काळ भारताला सोसावाच लागेल.

चीनने थेट पंगा घेऊन अमेरिकेला त्याची जागा दाखविण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे चिनी वस्तूंचा पुरवठा अमेरिकेत अतिशय मंदावेल; मात्र, अमेरिकेत निर्यात होणाऱ्या चीपसह असंख्य वस्तू कुठल्या बाजारपेठेत विकायच्या यासाठी त्यांनी शोधाशोध सुरू केली आहे. युरोपसह काही देश त्यांनी हेरले आहेत. भारतही मोठी बाजारपेठ असल्याने संबंध सुधारून आपल्या वस्तूंना संधी निर्माण करण्याचा पवित्रा चीनने घेतला आहे. अर्थात भारतानेही त्याबाबत आस्ते कदमची भूमिका स्वीकारली आहे. अमेरिकन शेअर बाजार आणि डॉलरवर जबर आघात करण्याची क्षमता चीनकडे आहे. त्यामुळे त्यास अस्त्र समजून चीन ही संधी नक्कीच गमावणार नाही. अमेरिकेचा कठोर निर्णय त्यांच्याच घशात कसा अडकवता जाईल, याचे डावपेच चीनकडून नक्कीच खेळले जातील.

संयुक्त राष्ट्राप्रमाणेच जागतिक व्यापार संघटनाही किती कमकुवत आहे, याचा प्रत्यय जगाला यानिमित्ताने येईल. अनेक देशांनी अमेरिकेच्या धोरणाविरोधात संघटनेकडे तक्रार केली आहे. याची दखल घेऊन संघटना अमेरिकेवर दबाव टाकेल किंवा कारवाई करेल, याची शक्यता धूसर आहे. त्यामुळे ही संघटना मोडीत निघून त्याजागी दुसरी संघटना येणार की, याच संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी काही हालचाली होणार हे सुद्धा महत्त्वाचे आहे. अर्थातच चीनची भूमिका यामध्ये अतिशय महत्त्वाची ठरेल.

अमेरिकेच्या धरसोड आणि मनमानी निर्णयाविरोधात जगातील अनेक देशांमध्ये असंतोष आहे. त्यामुळे अमेरिकाविरोधी गट अधिक सक्रिय होईल. अमेरिकेला धडा शिकविण्यासाठी किंवा जुने हिशोब वसूल करण्यासाठी शहकाटशहाचे राजकारण नक्कीच वेग घेईल. युरोपातील देश, जपान, ऑस्ट्रेलिया, रशिया हे सुद्धा या संधीचा फायदा उचलून अमेरिकेला खिंडीत गाठायचा नक्कीच प्रयत्न करतील.

ब्रिक्ससारखा गट यानिमित्ताने अधिक ताकदवान होईल, अशी चिन्हे आहेत. ट्रम्प यांनी यापूर्वीच ब्रिक्सला विविध इशारे दिले आहेत. ब्राझिल, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण अफ्रिका या देशांच्या या गटात लवकरच तुर्की, इंडोनेशिया आणि सौदी अरेबिया हे देश सहभागी होण्याची चिन्हे आहेत. येत्या जुलैमध्ये ब्रिक्स गटाची परिषद ब्राझिलमध्ये होत आहे. त्यात विविध प्रकारचे ठोस निर्णय अपेक्षित आहेत. खासकरून डॉलरला पर्याय म्हणून ब्रिक्स गटाचे स्वतःचे चलन विकसित करण्यासह मुक्त व्यापाराला चालना देणारे अनेक निर्णय होऊ शकतात. तसेच, अनेक देश या गटामध्ये सामिल होण्यासाठी उत्सुकता दर्शवतील. परिणामी, अमेरिकाविरोधी या गटाचा दबदबा यापुढील काळात निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेला त्याचा मोठा फटका बसू शकतो.

ट्रम्प यांच्या हेकेखोर आणि लहरी निर्णयामुळे जगभरात जणू हाहाकार उडाला आहे; मात्र, याचे रूपांतर पारंपरिक प्रत्यक्ष युद्धामध्ये होण्याची शक्यता नाही. कारण, युद्ध हे परवडणारे नाही. त्यापेक्षा डावपेच टाकून अमेरिकेला शह देण्याच्या खेळीला प्राधान्य दिले जाईल. कोविड महामारीनंतर ज्या पद्धतीने जगभरात अनेक बदल झाले, त्याच धर्तीवर आताही अनेक बदल होण्याची शक्यता आहे. भलेही अमेरिका महासत्ता असेल, पण त्यांची मनमानी जगभर चालणार नाही, हे सुद्धा सिद्ध केले जाईल. जागतिकीकरणामुळे जगाच्या पुढ्यात काय येऊ शकते, याचा प्रत्यय यानिमित्ताने आला आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी चीन वगळता अन्य देशांना शुल्कवाढीस ९० दिवसांचा ब्रेक दिल्याचे वृत्त आताच हाती आले आहे. अमेरिकन हित सांगत काहीही लहरी निर्णय घेऊन फक्त खळबळ उडते, प्रत्यक्षात देशच अडचणीत येतो हे यानिमित्ताने अधोरेखित होईल. निर्णय अमेरिकेचा असला, तरी धडा मात्र संपूर्ण जगालाच मिळेल आणि जगभर नवनवीन समीकरणांचा जन्म होईल, एवढे मात्र निश्चित.

# पीओपीचा तिढा सुटता सुटेना



मुंबईतील गणेशमूर्ती कार्यशाळांमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती घडवण्यावर बंदी आणल्यानंतर आता मुंबईबाहेरून शहरात येणाऱ्या पीओपी मूर्तींवर निर्बंध आणण्यासाठी कोकण विभागीय आयुक्तांना मुंबई महापालिकेने पत्र पाठवले आहे. एकट्या मुंबईत दोन लाख घरांमध्ये गणरायांची स्थापना होते. त्यातील ९५ टक्के गणेशमूर्ती, तर १८ हजार सार्वजनिक मंडळांमधील ९७ टक्के गणेशमूर्ती या पीओपीच्या असतात. एकट्या पेण, हमरापूर भागातून दीड लाखांहून अधिक पीओपी गणेशमूर्ती मुंबईत येतात. त्यामुळे या मूर्तींच्या वाहतूकीवर निर्बंध आल्यास या भागातील १५ ते २० हजार लोकांचा रोजगार हिरावला जाईल. दुसरीकडे, पीओपी मूर्ती घडवणाऱ्या कारखान्यांना मुंबई महापालिकेने परवानगी नाकारल्यामुळे सार्वजनिक मंडळांच्या मूर्ती घडवण्याच्या व्यवसायातील १० ते १२ हजार रोजगारांवर गदा येण्याची शक्यता बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समितीने वर्तवली आहे.

या मुद्द्यावर मूर्तिकार संघटना पीओपी बंदीचा निर्णय मागे घेण्याची मागणी करीत आहेत. गणेशोत्सवाला चार महिने उरले असताना ही स्थिती उद्भवल्याने मंडळांमधील धाकधूकही वाढली आहे. या मुद्द्यावर मार्ग काढण्यासाठी राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोगाची मदत राज्य सरकारने घेतली आहे. आयोगाने नेमलेल्या पाच सदस्यीय समितीत आयआयटी, आयसीटीमधील तज्ञांचा समावेश आहे. १९ एप्रिलपर्यंत या समितीकडून अहवाल येणे अपेक्षित आहे. पीओपीमुळे खरेच पर्यावरणाची हानी होते का? याविषयीची स्पष्टता ही समिती आणणार आहे. सोबतच पीओपीला काय पर्याय असू शकतो? आत्तापर्यंत चालत आलेल्या पारंपरिक पद्धतींऐवजी इतर कोणत्या नवीन पद्धतींचा स्वीकार करून या प्रश्नावर तोडगा निघू शकतो का? या मुद्द्यांवरही ही समिती सरकारला आपले निष्कर्ष सादर करणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पीओपी बंदीच्या कडक अंमलबजावणीसाठी मुंबईसह अनेक महापालिकांनी मूर्तिकारांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. दुसरीकडे शाडूच्या मातीची उपलब्धताही पालिकांनी मूर्तिकारांना करून दिली आहे. पण या शाडूच्या मातीतून मागणीच्या केवळ ४ ते ५ टक्के गणेशमूर्ती घडवणे शक्य असल्याचे मूर्तिकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे ठोस पर्याय दिल्याशिवाय पीओपी बंदी लागू होऊ नये यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा, अशी गणेश मंडळे आणि मूर्तिकारांची अपेक्षा आहे. त्यामुळे येत्या महिन्याभरात राज्य सरकारला पीओपीबाबतची आपली भूमिका स्पष्ट करावी लागणार आहे अन्यथा हा विषय अधिकच चिघळू शकतो.

## पावटा खिचडी



**साहित्य** : ओले पावटे, तांदूळ, ओला लसूण, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर, कांदा, तूप, अख्खा गरम मसाला, गोडा मसाला, गुळ, हळद, मीठ.

**कृती** : ओले पावटे हळद मीठ घालून किंचित उकडून घ्यावेत. १ वाटी तांदूळ धुवून, निथळवून घ्यावा. ओला लसूण, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर याचे वाटण करून घ्यावे. कांदा चिरून घ्यावा. तूप गरम करून त्यात अख्खे मसाले घालून, परतून मग त्यात कांदा घालावा. ते लालसर झाल्यावर त्यावर हिरवे वाटण घालून परतावे. तांदूळ आणि पावटे घालून पुन्हा परतून घ्यावे. गोडा मसाला, गुळ, मीठ घालून दोन वाट्या पाणी घालावे. बाजूने थोडे तूप सोडावे. कुकरमध्ये शिट्टी काढावी. पावटाभात तयार आहे.

# ॲलर्जी असणाऱ्या त्वचेसाठी मेकअप

**त्वचा संवेदनशील असेल तर अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. कोणतंही मेकअप प्रॉडक्ट वापरण्यापूर्वी त्याचं त्वचेवर परीक्षण करणं गरजेचं ठरतं. ॲलर्जीमुळे अनेक मेकअप प्रॉडक्ट वापरणं अवघड होऊन बसतं. ॲलर्जिक त्वचेचा मेकअप कसा करावा याविषयी...**





■ ॲलर्जिक त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी मेकअपची सुरुवात क्लिंजिंग आणि मॉइश्चरायझिंगने करावी. त्यानंतर फाऊंडेशनचा अत्यंत पातळ थर लावून घ्यावा.

■ नंतर चीकबोन्सच्या थोडं खाली, नाकाच्या दोन्ही बाजूला आणि कपाळाच्या बाजूंना ब्रोंजर लावा. नाकाला अधिक उठाव येण्यासाठी काँट्यूर मेकअप करा.

■ ॲलर्जिक त्वचा असणाऱ्यांनी डोळ्यासाठी मेकअपची उत्पादनं खरेदी करताना सावधगिरी बाळगावी.

■ टिश्यू आणि मेकअप ब्रशचा वापर टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. त्याऐवजी सुती रुमालाचा वापर करावा.

■ ॲलर्जीमध्ये डोळ्याखालच्या त्वचेवर सर्वात जास्त परिणाम होतो. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी अंडर आय क्रीम लावावं.

■ कोणत्याही उत्पादनाचा वापर करण्यापूर्वी ते तुमच्या त्वचेसाठी कितपत उपयोगी ठरेल याची माहिती घ्या.

■ ॲलर्जिक स्कीन असणाऱ्यांनी शक्यतो स्वतःचे मेकअप प्रॉडक्ट इतरांबरोबर शेअर करू नयेत.

**भात खाल्ल्याने वजन वाढते, पोट सुटते म्हणून तुम्हीही भात खाणे टाळता का? मग भातासंबंधित असलेले तुमचे समज-गैरसमज दूर करण्याची गरज आहे. सेलिब्रेटी न्यूट्रिशनिस्ट ऋजुता दिवेकर सांगते आहे वरण-भात खाण्याचे महत्त्व आणि फायदे...**

# 'या' फायद्यांसाठी आहारात भाताचा अवश्य समावेश करा!

**हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी**

वरण भात खाल्ल्याने तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले राहते. तर ब्लड शुगर नियंत्रित राहते. इतकंच नाही तर वरण भात पचायलाही हलका असतो. त्याचबरोबर रात्रीची झोपही नीट येण्यास मदत होते. तसंच भात खाल्ल्याने पोटातील आतडे मजबूत होतात आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते.

**विविध फायदे**

भातात अमिनो ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. याचा प्रभाव मसल्सवरही होतो. वर्कआऊट करत असाल तर भात खाणे लाभदायी आहे.कारण भात खाल्ल्याने वर्कआऊटचे परिणाम लवकर दिसून येतात. भातात मेथिओनिन, व्हिटॅमिन बी१ आणि रेजिस्टेंट स्टार्च असतात. मेथिओनिनमध्ये असलेल्या अमिनो ॲसिडमध्ये सल्फरचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर वाढत्या वयाचा परिणाम कमी करण्यासाठीही भात खाणे फायदेशीर ठरते.

**त्वचेसाठीही फायदेशीर**

लिव्हरमधील विषद्रव्य (टॉक्झिन्स) बाहेर टाकण्यासही मदत होते. चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या, केस पांढरे होणे यावर उपाय म्हणूनही भात खाल्ला जातो. कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर देखील भात खाणे फायदेशीर ठरते.




# जीवनशैलीतील 'या' बदलांमुळे तुम्ही निरोगी दीर्घायुषी व्हाल!

**रात्री झोपण्यापूर्वी अनेक जण सकाळी लवकर उठून व्यायाम करण्याचा विचार करतात. मात्र सकाळी लवकर उठणे शक्य होत नाही. आपल्या धकाधकीच्या आणि गुंतागुंतीच्या जीवनशैलीचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे या धावपळीतून स्वतःसाठी वेळ काढणे गरजेचे आहे. तर आपल्या जीवनशैलीत काही लहान सहान बदल केल्यास तुम्हाला निरोगी दीर्घायुष्य लाभेल. पाहुया काय आहेत ते बदल...**

**शारीरिक हालचाली बंद करू नका** : वाढत्या वयानुसार अवयवांचे काम करणे काहीसे मंदावते. पण तुम्ही थांबू नका. हालचाल, काम करणे बंद करू नका. जिने चढा. चाला, फिरा. असा काहीना काहीतरी शारीरिक हालचाली चालू राहू द्या. त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होईल.

**वजन नियंत्रित ठेवा** : सात्त्विक, संतुलित आहार घ्या. त्यामुळे वजन गरजेपेक्षा अधिक वाढणार नाही. आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे यांचा समावेश करा.



मांसाहारी पदार्थ तुम्हाला आवडत असतील तर जरूर खा. पण त्याचा अतिरेक टाळा. त्याचबरोबर दूध, अंडी अवश्य खा. त्यामुळे शरीराला प्रोटीन्स भरपूर प्रमाणात मिळतील. अशा संतुलित आहाराने शरीराचे वजन नियंत्रित राहील.

**आनंदी रहा** : घरी किंवा ऑफिसमध्ये नेहमी गंभीर राहणे गरजेचे नाही. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत, मित्रमंडळींसोबत हसत खेळत राहू शकता. त्यामुळे तुमचे शरीर-मन रिलॅक्स होईल. थकवा दूर होईल आणि तुम्ही प्रसन्न रहाल.

**भावना शेअर करा** : भावभावना, अनुभव शेअर केल्याने मन मोकळे होते. भावना, विचारांचे आदान प्रदान झाल्याने नवीन काही शिकायला मिळते.

# अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची ही आहे सोपी पद्धत

**अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची एक सोपी पद्धत पाहूया, ज्यामुळे तुमच्या फोनवर येणारे अनावश्यक आणि अनोळखी कॉल्स थांबवता येतात.**

अनोळखी फोन नंबर अनेकदा डोकेदुखी ठरू शकतात. त्यामुळे जर तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनावश्यक आणि अनोळखी नंबर्स ब्लॉक करायचे असतील तर आम्ही तुम्हाला त्याची एक सोपी पद्धत सांगणार आहोत. गुगलच्या फोन ॲपवर बाय डिफॉल्ट एक पद्धत उपलब्ध आहे. परंतु इतर कंपन्यांची पद्धत वेगवेगळी आहे.

आम्ही तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्याची सुरुवात गुगल फोन ॲपपासून करून जे गुगल पिक्सल वनप्लस आणि नोकियाच्या स्मार्टफोन्समध्ये आधीपासून इंस्टॉल करण्यात आलेलं असतं. तुम्ही हे गुगल प्ले स्टोअरवरून देखील तुमच्या अँड्रॉइड डिव्हाइसवर डाऊनलोड करू शकता. आम्ही या आर्टिकलमध्ये सॅमसंग आणि शाओमी फोनवरदेखील अनोळखी नंबर ब्लॉक करण्याची पद्धत सांगितली आहे.

### गुगल फोन ॲपवर अनोळखी नंबर कसे ब्लॉक करायचे

- गुगल फोन ॲप असलेल्या अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर ब्लॉक करण्यासाठी :
- फोन ॲप ओपन करा.
- डायलर सर्च बारच्या वरच्या बाजूला उजवीकडे थ्री डॉट बटन प्रेस करा.
- सेटिंग्सवर टॅप करा आणि ब्लॉक्ड नंबर वर जा.
- अननोन ऑप्शन टर्न ऑन करा.

लक्षात असू द्या अँड्रॉइडमध्ये अननोनचा अर्थ ते नंबर्स नव्हे जे तुमच्या फोनमध्ये सेव्ह केले गेले नाहीत. तर त्याचा अर्थ जे तुमच्या कॉलर आयडीमध्ये प्रायव्हेट किंवा अननोन म्हणून फ्लॅश होतात.

# 'ड' जीवनसत्त्व आणि कॅल्शियमचे सप्लिमेंट्स घेतल्याने फ्रॅक्चर्स टाळता येऊ शकतात का?

**हाडांचे** आरोग्य चांगले राहावे, याकरिता कॅल्शियमच्या सप्लिमेंट आपण घेतो, आणि आपण घेत असलेले कॅल्शियम शरीरामध्ये शोषले जावे याकरिता 'ड' जीवनसत्त्वाचे सप्लिमेंटदेखील आपण घेत असतो. ही दोन्ही तत्त्वे आपल्या शरीरातील हाडांच्या आरोग्याच्या दृष्टीने जरी महत्त्वाची असली, तरी प्रसंगी एखाद्या लहानशा अपघातामुळे किंवा पडल्याने होणारी हाडांची फ्रॅक्चर्स या सप्लिमेंट्समुळे टाळता येऊ शकत नसल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधात म्हटले आहे. हा शोधनिबंध जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आला आहे. ज्या व्यक्तींना ऑस्टियोपोरोसिस आहे, म्हणजेच ज्या व्यक्तींची हाडे ठिसूळ झालेली आहेत, त्यांची हाडे अगदी लहानशा अपघातानेदेखील फ्रॅक्चर होऊ शकतात. हाडांची झीज कमी व्हावी याकरिता अशा व्यक्तींना कॅल्शियम आणि 'ड' जीवनसावाची सप्लिमेंट दिली जातात. पण या सप्लिमेंटचा उपयोग फ्रॅक्चर होण्यासाठी कितपत होऊ शकतो याबद्दल शास्त्रज्ञांच्या मिश्र प्रतिक्रिया आहेत. या अनुषंगाने चीनमधील तिआनजिन हॉस्पिटलमधील शास्त्रज्ञांनी एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाअंतर्गत, पन्नास वर्षे वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या वृद्ध व्यक्तींचे निरीक्षण करण्यात आले. या सर्व व्यक्ती 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियम सप्लिमेंट घेणाऱ्या होत्या. या व्यक्तींच्या चाचण्या करण्यात येऊन, त्याद्वारे हे निदान करण्यात आले की, 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियमच्या सप्लिमेंट घेऊनदेखील या व्यक्तींना एखाद्या इजेमुळे हाडे फ्रॅक्चर होण्याची शक्यता होती.

## खेळानंतर स्नॅक्सचे सेवन मुलांसाठी घातक

अनेक मुले खेळून आल्यानंतर जास्त स्नॅक्स सेवन करतात, त्यांच्यात त्यामुळे अनावश्यक उष्मांक वाढतात. परिणामी त्यांना आवश्यक असलेला आरोग्यावरील परिणाम साध्य होताना दिसत नाही, त्यानंतर मग आहारात बदल करण्याची वेळ येते, असे एका संशोधनात दिसून आले आहे. 'अमेरिकन जर्नल ऑफ हेल्थ बिहेवियर' या नियतकालिकात म्हटले आहे की, मुलांमध्ये खेळत असताना प्रत्येक खेळातून १७० उष्मांक जाळले जातात. हे खरे असले तरी खेळानंतर मुले अंदाजे २१३ उष्मांक घेतात. शाळेत खेळानंतर मुले दमतात व त्या नादात ते जास्त स्नॅक्स सेवन करतात. तरुणांच्या क्रीडा स्पर्धा, वाढदिवस यात स्नॅक्स सेवन करण्याची संस्कृतीच अमेरिकेत रूढ आहे, असे ब्रिगहॅम यंग विद्यापीठाच्या प्रमुख संशोधक लोरी स्प्रुअन्स यांचे म्हणणे आहे. खेळून आल्यानंतर मुलांनी गोड पदार्थ सेवन केल्याने त्यांच्यात उष्मांक वाढतात. या संशोधनानुसार तिसरी-चौथीतील मुले फुटबॉल, फ्लॅग फुटबॉल, बेसबॉल, सॉफ्टबॉल खेळतात. त्यांचे हे खेळ शारीरिक व्यायाम देणारे असले तरी नंतर ते उष्मांक वाढवणारे स्नॅक सेवन करतात त्यामुळे हवा तो परिणाम साध्य होत नाही. आईवडीलच या मुलांना ८० टक्के वेळा स्नॅक्स घेऊन देतात. ९० टक्के वेळा गोड शीतपेयेही घेऊन देतात, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो.

संशोधकांच्या मते खेळानंतरच्या स्नॅक्समधून २६ ग्रॅम साखर पोटात जाते. यात साखरयुक्त शीतपेये व इतर पेये मोठी घातक ठरतात. मुलांनी वयाच्या पाचव्या वर्षांपासून साठ मिनिटे तरी खेळले पाहिजे. त्याबरोबर जर उष्मांक अतिरिक्त वाढत असतील तर ते घातक आहे त्यामुळे मुलांना



# अशा पद्धतीने घरीच तयार करा फाऊंडेशन पावडर

**सध्या** लग्नसराईचा काळ सुरू आहे. आज कोणा मैत्रिणीचा साखरपुडा आहे तर उद्या मित्राचं लग्न. घरातही कोणत्या ना कोणत्या नातेवाईकाचे लग्न असतेच. या सगळ्यात प्रत्येक वेळी पार्लरमध्ये जाऊन मेकअप करणं परवडणारं असतंच असं नाही.





अनेकदा फाऊंडेशन, काजळ, लिपस्टिक आणि आयलायनर लावूनही मुली सुंदर दिसतात. पण तुम्हाला माहीत आहे का बाजारात मिळणारे फाऊंडेशन तुम्ही अगदी काही मिनिटांत घरच्या घरी करू शकता. तुम्ही हजारो रुपये महागड्या फाऊंडेशनसाठी खर्च करता का? तुम्ही जे महागडे मेकअपचे साहित्य वापरता त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या गोष्टी या त्वचेसाठी हानीकारक असतात. पण हेच मेकअपचे साहित्य जर तुम्हाला घरी तयार करता आले तर? चला तर मग घरच्या घरी फाऊंडेशन पावडर कसे तयार केले जाऊ शकते ते वाचू..

**साहित्य :**

- ऑलीव ऑईल
- जोजोबा ऑईल
- बदामाचे तेल
- चेहऱ्याला लावायची पावडर
- कोको पावडर

**कृती :**

चेहऱ्याला लावायच्या पावडरमध्ये कोको पावडर, ऑलीव ऑईल, जोजोबा ऑईल, बदामाचे तेल योग्य प्रमाणात टाका. हे मिश्रण जास्त जाड ही नको आणि जास्त पातळ ही नको. तयार झालेली पावडर बॉक्समध्ये टाकून सेट करा. १० मिनिटांत तयार आहे घरच्या घरी फाऊंडेशन पावडर.

# ब्राऊन राईस खा आणि निरोगी राहा

**तुम्हाला भात मनापासून आवडत असेल, पण वजन वाढेल या भीतीने तुम्ही तुमच्या आवडत्या अन्न पदार्थापासून लांब राहत असाल, तर आता तुम्हाला तुमचा मोह आवरण्याची जरासुद्धा गरज नाही. तुम्ही तुमच्या आहारामध्ये ब्राऊन राईस समाविष्ट करा आणि वजन वाढेल याची काळजी न करता भाताचे सेवन करा. ब्राऊन राईस म्हणजे नक्की काय, तर पॉलिश न केलेल्या, अन-रिफाइन्ड तांदळाला ब्राऊन राईस असे म्हटले जाते. तांदळाच्या दाण्याला सालीची दोन ते तीन आवरणे असतात. ब्राऊन राईस तयार करण्यासाठी तांदळावरील केवळ सर्वात बाहेरची, जाडसर असलेली साल काढली जाते. बाकीच्या पातळ साली तांदळावर तशाच ठेवल्या जातात, म्हणूनच हा तांदूळ दिसायला 'ब्राऊन', म्हणजेच भुरकट रंगाचा दिसतो. पांढरा तांदूळ तयार होताना त्यावरील सर्वच सालींची आवरणे काढून टाकली जातात, त्यामुळे तो तांदूळ शुभ्र पांढरा दिसतो. पण पांढऱ्या तांदळामध्ये केवळ स्टार्च असतो.**



**ब्राऊन** राईस आणि पांढऱ्या तांदळामध्ये कॅलरीज आणि कर्बोदकांचे प्रमाण जरी एकसमान असले, तरी पांढरा तांदूळ बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये, त्यामध्ये असलेले बी३, बी१, बी६, ही जीवनसत्त्वे, मॅग्नेशियम, फॉस्फरस, लोह, फायबर आणि फॅटी ॲसिड्स ही पोषक तत्त्वे पूर्णतः नष्ट होऊन जातात. त्यामुळे पांढऱ्या तांदळापेक्षा ब्राऊन राईसचे सेवन आरोग्यास अधिक हितकारी असल्याचे आहारतज्ज्ञांचे म्हणणे आहे. ब्राऊन राईस मध्ये कर्बोदके, प्रथिने, फायबर, मॅग्नेशियम, थियामीन, फॉस्फरस, पोटॅशियम इत्यादी महत्त्वपूर्ण पोषक तत्त्वे असून, याचे सेवन शरीराच्या आरोग्यासाठी अतिशय फायद्याचे आहे.

ब्राऊन राईसमध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर असून, यामुळे रक्तामधील घातक कोलेस्टेरोलचे प्रमाण कमी होते. तसेच रक्तामधील शुगर नियंत्रित होते.

त्यामुळे मधुमेह असणाऱ्यांना याच्या सेवनाने विशेष फायदा मिळतो. फायबरचे प्रमाण यामध्ये जास्त असल्याने भूक शमते, तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होते. त्यामुळे बद्धकोष्ठ किंवा पचनाशी निगडित इतर समस्या दूर होतात.

फायबरमुळे कोलोन आणि पचनेन्द्रियाचे कार्य सुरळीत ठेवण्यास मदत होते व कोलेस्टेरोलचे प्रमाण नियंत्रित राहिल्याने हृदयाचे आरोग्यदेखील चांगले राहते.

ब्राऊन राईसमध्ये असलेल्या सेलेनियम आणि फेनोल्स या तत्त्वांमुळे कोलोन कॅन्सर होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होतो. तसेच ही तत्त्वे थायरॉइड ग्रंथीचे कार्य नियंत्रित करण्यास सहाय्यक आहेत. यामध्ये असलेले मॅग्नेशियम हाडांच्या आरोग्यासाठी चांगले असून, त्यामुळे नर्व्हस सिस्टमही चांगली राहते. शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास देखील ही सर्व तत्त्वे सहाय्यक आहेत. यामध्ये असलेल्या फायबरमुळे पोट खूप काळ भरलेले राहते. त्यामुळे भूक लागणे कमी होऊन, वारंवार काही ना काही खात राहण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी वजन घटण्यास मदत होते.

# अनेक गुणांचा खजिना : काकडी

**जगामध्ये सर्वप्रथम ज्या भाज्या पेरल्या आणि उगवल्या गेल्या त्यामध्ये काकडी या फळभाजीचा समावेश आहे. काकडीची पैदास भारतामध्ये सर्वात आधी उत्तर भारतामध्ये सुरू झाली. वर्तमान काळामध्ये संपूर्ण जगामध्ये मोठ्या प्रमाणावर उगवल्या जाणाऱ्या भाज्यांमध्ये टोमॅटो, कांदे आणि फुलकोबी पाठोपाठ काकडीची पैदास सर्वात जास्त होत असते. अनेक जीवनसत्त्वे आणि क्षार यांनी परिपूर्ण असलेली ही फळभाजी आजकालच्या काळामध्ये 'सुपर फूड'च्या श्रेणीपर्यंत येऊन ठेपली आहे.**



**काकडी** हा एक लो कॅलरी अन्नपदार्थ असून, शंभर ग्रॅम काकडीमध्ये केवळ पंधरा कॅलरीज आहेत. वजन कमी करण्याची इच्छा असणाऱ्यांनी काकडीचा समावेश आपल्या आहारामध्ये अवश्य करायला हवा. यामध्ये अ, बी१, बी६, क ही जीवनसत्त्वे असून, काकडी पोटॅशियमचीदेखील उत्तम स्रोत आहे. शंभर ग्रॅम काकडीमध्ये सुमारे १४७ ग्रॅम पोटॅशियम असते, त्यामुळे याच्या सेवनाने रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत मिळते. हृदयाच्या स्वास्थ्यासाठी देखील काकडीचे सेवन करणे चांगले.

काकडीमध्ये ९५ टक्के पाणी असल्याने याच्या सेवनाने शरीरामध्ये पाण्याची कमतरता होत नाही. तसेच यामुळे शरीराचे तापमान देखील नियंत्रित राहण्यास मदत होते. काकडीमध्ये अनेक रोगोपचारक गुण आहेत. यामध्ये असलेले पॉलीफेनोल्स अनेक तऱ्हेच्या कर्करोगांपासून शरीराचा बचाव करण्यास सक्षम आहेत. काकडीमध्ये पाणी आणि फायबर मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे याच्या सेवनाने शरीरातील घातक पदार्थ बाहेर टाकले जाऊन शरीराची पचनक्रिया सुरळीत राहते. काकडीचा रस दररोज घेतल्याने गॅसेस, ॲसिडिटी, छातीत जळजळ अशा अपचनाशी निगडित तक्रारींना आळा बसतो. काकडी सिलीकाचे उत्तम स्रोत आहे. सिलीकामुळे शरीरातील कनेक्टिव्ह टिश्यू बळकट होतात. मधुमेहाच्या रुग्णांसाठी काकडीच्या रसाचे सेवन विशेष फायद्याचे आहे. काकडीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणावर असून काकडी त्वचेकरिता देखील चांगली आहे. काकडीमधील ॲस्कॉर्बिक ॲसिड आणि 'क' जीवनसत्त्वामुळे शरीरामध्ये कोलाजेनचे निर्माण होऊन त्यामुळे त्वचा सुंदर 'ब' नितळ दिसू लागते. तसेच याच्या नियमित सेवनाने केसांचे आरोग्यदेखील चांगले राहते. काकडी विकत घेताना नेहमी गडद हिरव्या रंगाची काकडी निवडावी. सालांवर डाग असलेली, हाताला नरम लागणारी आणि जाडसर दिसणारी काकडी घेऊ नये. काकडी फ्रीजमध्ये स्टोअर करावी, मात्र कोणत्याही प्रकारची फळे काकडीजवळ ठेवू नयेत, अन्यथा काकड्या लवकर पिवळ्या पडतील व त्यांची गुणवत्तादेखील कमी होईल.

# आरोग्यासाठी लिंबाचे फायदे

**लिंबू** हे फळ आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी आहेच, पण त्याशिवाय त्वचेच्या सौंदर्यासाठी देखील याचा वापर करण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. लिंबाचा सुवास हा मन प्रफुल्लित करणारा आहे. किंबहुना मन उदास असताना लिंबाचा सुवास मनाला प्रसन्नता देणारा असल्याचे तज्ज्ञ म्हणतात. लिंबामध्ये जीवाणू प्रतिरोधक तत्त्वे आहेत. लिंबाचा रस हा केवळ त्वचेसाठी नाही, तर केसांच्या उत्तम आरोग्यासाठीही उपयुक्त आहे. लिंबाचा रस त्वचेवर लावल्याने त्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग, मुरुमे, पुटकुळ्या आणि इतर समस्या कमी होण्यास मदत होते. लिंबाच्या फोडी गुडघ्यांवर किंवा कोपरांवर चोळल्यास तेथील काळसरपणा आणि कोरडेपणा दूर होऊन तेथील त्वचा मुलायम होण्यास मदत होते. नखांवर आलेला पिवळेपणा हटवण्यासाठीही लिंबाचा रस उपयुक्त आहे. लिंबाचा रस संधिवात आणि पचनाशी निगडित समस्या दूर करण्याच्या उद्देशाने उपयुक्त आहे. तसेच ज्यांना किडनीशी निगडित विकार असतील, त्यांच्यासाठी लिंबाच्या रसाचे पाण्यामध्ये मिसळून केले गेलेले सेवन उपयुक्त ठरते. या रसाच्या नियमित सेवनाने मलेरिया आणि कॉलरासारख्या रोगांची प्रतिकारशक्ती शरीरामध्ये निर्माण होत असते. लिंबामध्ये 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर असून, यामध्ये 'इ' आणि 'अ' जीवनसत्त्वे, तांबे, क्रोमियम आणि भरपूर प्रमाणात अँटी ऑक्सिडंट्स असतात. लिंबाच्या फोडी रात्री झोपताना झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्याने खोलीतील हवा जंतुमुक्त होते, तसेच खोलीमध्ये लिंबाचा मन प्रसन्न करणारा सुवासही दरवळत राहतो. रात्री झोपण्यापूर्वी लिंबाच्या फोडी झोपण्याच्या खोलीमध्ये ठेवल्या गेल्यास सर्दी-पडसे किंवा एखादी ॲलर्जी लवकर बरी होण्यास मदत होते.



## सुधीर साळवी कोण?

लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळामुळे सुधीर साळवी यांच्याभोवती एक वलय निर्माण झाले आहे. गणपतीच्या काळात अनेक बडे नेते आणि सेलिब्रिटी हे लालबागच्या दर्शनाला येतात. यावेळी सुधीर साळवी सर्वांचे आदरातिथ्य करताना दिसतात. त्यामुळे, सुधीर साळवी यांचा चांगलाच 'वट' तयार झाला आहे. त्यातच, विधानसभा निवडणुकांपूर्वी लालबागमधील त्यांच्या कार्यालयासमोर जमून शक्तीप्रदर्शन केले होते. त्यामुळे साळवी हे विधानसभेला वेगळा निर्णय घेतील, अशी चर्चा होती. भाजप आणि शिंदे गट त्यांच्यासाठी गळ टाकून बसल्याचे सांगितले जात होते. परंतु, मातोश्रीवर बोलावून सुधीर साळवी यांची योग्यप्रकारे समजूत काढण्यात आली, व ते ठाकरेंसोबत एकनिष्ठ राहिले.



# तुम्ही लालबागकर आहात, मातोश्रीवर आलेल्या सुधीर साळवींना उद्धव ठाकरेंनी दिलं नवं मिशन

**मुंबई :** विधानसभेनंतर आता आगामी महापालिका निवडणुकांसाठी शिवसेना युबीटी पक्षाने बांधणी सुरू केली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नुकतेच पक्षाचे प्रवक्ते आणि काही पदाधिकाऱ्यांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर, आता मुंबईतील लालबागचे शिवेसना सुधीर साळवी यांच्याकडे सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. आगामी मुंबई महानगरपालिकेच्यादृष्टीने उद्धव ठाकरे यांचा हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. त्यातच, आपलं लक्ष मुंबई महानगर पालिकांच्या निवडणुकांवर आहे, त्यासाठीच सुधीरला सचिव पद दिलंय, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. सुधीर साळवी यांची शिवसेना सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतर लालबाग परळ येथील शिवसैनिक मातोश्रीवर पोहोचले होते. यावेळी, उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांशी संवाद साधला.

सुधीरवर मोठी जबाबदारी दिली आहे, तुम्ही लालबागकर आहात. सुधीर आता लालबागमध्ये राहिला, त्याला शिवसेनेचे सचिवपद दिलं आहे. लालबाग परळ म्हणजे कट्टर शिवसैनिक आलाच. काल परवा बातम्या आल्या उद्धव ठाकरे यांची मोठी खेळी. पण, आपलं लक्ष आता मुंबई महानगरपालिका आहे, त्यासाठी सुधारला सचिव पद दिलेलं आहे, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. मी सुधारला मुंबईत पळवणार आहे, सर्वच एकत्र आहात, एकजुटीने रहा. मुंबई आणि महाराष्ट्रावरील संकट बाजूला टाकण्यासाठी आपण एकत्र आहोत, असेही उद्धव ठाकरेंनी यावेळी म्हटले.

दरम्यान, लालबाग परिसर हा ठाकरे गटाचा बालेकिल्ला मानला जातो. त्यामुळे, सुधीर साळवी यांच्याकडे मोक्याच्या क्षणी पक्षाचे सचिवपद देऊन उद्धव ठाकरे यांनी अनेक राजकीय समीकरणे साधल्याची चर्चा आहे. तर, सुधीर साळवी यांना अखेर लालबागचा राजा पावला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### विधानसभेला उमेदवारी नाकारली

सुधीर साळवी हे सुप्रसिद्ध लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे गेले २० वर्षे मानद सचिव आहेत. लालबाग परिसरात त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. त्यामुळेच, विधानसभा निवडणुकांवेळी शिवडी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची इच्छा त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंकडे व्यक्त केली होती. मात्र, विद्यमान आमदार अजय चौधरी यांनाच तिकीट देण्यात आले. त्यावेळी सुधीर साळवी यांचे कार्यकर्ते प्रचंड नाराज झाले होते. मात्र, आता कार्यकर्त्यांची नाराजी दूर झाल्याचं दिसून येत आहे. कारण, सुधीर साळवी यांना सचिवपदाची जबाबदारी देण्यासोबतच आगामी मुंबई महापालिका निवडणुकांचेही मिशनही उद्धव ठाकरेंनी दिले आहे.

# परवानगीच्या कात्रीत अडकले पक्षीगृह

## केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी नाही




**मुंबई :** मुंबई महापालिकेतर्फे मुलुंड येथे लवकरच पक्षीगृह उभारण्यात येणार आहे. वर्षभरात त्याला वेग देण्याचा पालिका प्रशासनाचा प्रयत्न होता. मात्र, संग्रहालयाला केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाची मंजुरी मिळाली नसल्याने पक्षीगृहाचे काम रखडले आहे. त्यामुळे पूर्व उपनगरवासियाना आणखी काही काळ पक्षीगृहासाठी प्रतिक्षा करावी लागणार आहे. नाहूर गाव परिसरात सीटीएस क्रमांक ७०६ हा भूखंड पालिकेने उद्यान व वाहनतळ या उद्देशासाठी आरक्षित आहे. आरक्षित भूखंडाचा विकास करण्यात येणार असून या ठिकाणी सर्व सुविधांनी युक्त असे उद्यान तयार करण्यात येणार आहे. तसेच या उद्यानात पक्षीगृह तयार करण्यात येणार आहे. महापालिकेने या कामासाठी २०२३ मध्ये निविदा मागवल्या होत्या. यासाठी केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाकडे या कामासाठी पाठपुरावा सुरू होता. मात्र केंद्राच्यावतीने अद्याप परवानगी मिळाली नाही. जोपर्यंत केंद्राची परवानगी मिळत नाही. तोपर्यंत पुढील कामाची सुरुवात करता येणार नसल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. भायखळा येथील वीरमाता जिजाबाई उद्यानातील पक्षीगृहाच्या धर्तीवर हे पक्षीगृह बनवण्यात येणार आहे.

### असे आहे पक्षीगृहाचे नियोजन

मुलुंड येथे प्रस्तावित पक्षी उद्यानात १८ दुर्मीळ प्रजातींसह २०६ प्रजातींचे पक्षी असणार आहेत. मुंबई महापालिकेच्या योजनेनुसार मुलुंड पक्षी उद्यान हे वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान व प्राणीसंग्रहालयाचे (भायखळा) उपकेंद्र असणार आहे. याचे क्षेत्रफळ १७ हजार ९५८ चौरस मीटर आहे. पक्षीगृहासाठी १० हजार ८५९ चौरस मीटर आणि खेळांसाठी ३ हजार ७२८ चौरस मीटर क्षेत्र या उद्यानात राखीव असणार आहे.

# परभणीत लहानग्यांना बाजेवर आंघोळ घालून टोपल्यात साठवलेल्या पाण्यात कपडे धुण्याची वेळ!



गावात 84 लाख रुपये खर्चून नळ योजना टाकली असल्याचं गावकरी सांगतायत. जर 84 लाख रुपये खर्चून ही गावकऱ्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असेल तर या कामात झालेला भ्रष्टाचार समोर आलाच पाहिजे, अशी मागणी गावकरी करतायत. उमला नाईक तांडा वाशीयांची पाण्यासाठी होणारी होरपळ थांबणे आणि ग्रामस्थानां नळातून पाणी मिळणे आवश्यक आहे.

**परभणी :** परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील उमला नाईक तांड्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हंडाभर पाण्यासाठी ग्रामस्थांना वणवण भटकंती करावी लागत असून गावातील लोकांनी पाणी चोरी जाऊ नये म्हणून कुलूप बंद केलय, पाणीच नसल्याने लहानग्यांना बाजेवर आंघोळ घालून टोपल्यात साठवलेल्या पाण्याने कपडे धुण्याची वेळ आलीये.

बंद पडलेला हापसा,गाडीवर बांधलेली टाकी,घरासमोर पाणी साठवण्यासाठी कुलूप बंद असलेले शौचालय, असे चित्र सध्या परभणीच्या गंगाखेडमध्ये पाहायला मिळतं. लहान मोठ्यांची हपश्यावर झालेली गर्दी पाहून गावात पाण्याचे किती दुर्भिष्य आहे? ते तुमच्या लक्षात येईल.पाणी आणण्यासाठी आज्जीनाही हंडा घेऊन घराबाहेर पडावं लागतंय.

परभणीच्या गंगाखेड तालुक्यातील उमला नाईक तांड्यातील, उमला नाईक तांड्यात साडेपाचशे लोकवस्ती आहे. उमला नाईक तांडा ही पडेगाव ग्रामपंचायतील गट ग्रामपंचायत आहे. पाणी टंचाई ही तांड्याच्या पाचवीलाच पुजलेली आहे. गावात लाखो रुपये खर्चून नळ योजना दोन वर्षांपूर्वी गावात आणण्यात आली,पण नळाला काय थेंब भर पाणी आले,त्यामुळे येथील लोकांना दोन किमी अंतरावरून पायपीट करीत हंडाभर पाणी आणावे लागतंय. येथील बायका पाण्याची बचत व्हावी म्हणून बाजेखाली टोपलं ठेऊन मुलांना बाजेवर अंघोळ घालतात. बाजेखाली टोपल्यात साचलेल्या पाण्यात मुलांना अंघोळ घालावी लागतेय.

गावात पाणीच नसल्याने लेकराबाळांची तहान भागविण्यासाठी गावकऱ्यांना २ किमी दूर असलेल्या हपश्यावर जाऊन पाणी भरावे लागतेय. येथेच बायका धुणी धुत असतात. गुराढोरांना रांगेत उभं राहून पाणी प्यावे लागते. पाणीच नसल्याने लोकांनी शौचालय कुलूप बंद केली आहेत. एवढंच नाही तर गावातील लोकांनी पाण्याची चोरी होऊ नये म्हणून अक्षरशः पाण्याच्या टाकीला कुलूप लावून टाकलंय.

# ठाणे आता सीसीटीव्हीच्या निगराणीखाली!

## शहरात सीसीटीव्हीच्या खोदकामासाठी पालिकेकडून हिरवा सिग्नल

**ठाणे :** ठाणे शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला अखेर ठाणे महापालिकेने हिरवा सिग्नल दिला आहे. सीसीटीव्ही बसवण्यासाठी ठाणे महापालिका क्षेत्रात खोदकाम करावे लागणार असल्याने ठाणे महापालिकेच्या वतीने हरकत घेण्यात आली होती. त्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला सुरुवात झाली नव्हती. मात्र गेल्या आठवड्यात अखेर ठाणे महापालिकेने ही परवानगी दिली असल्याने ठाणे पोलिसांचा सीसीटीव्ही बसवण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

शहरांमधील गुन्हेगारीला आळा बसावा तसेच शहरे सुरक्षित राहावीत यासाठी संपूर्ण ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात तब्बल ६ हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्हीचे जाळे बसवण्याचा प्रस्ताव ठाणे पोलिसांकडून तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात येत असलेल्या इतर पालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या कामाला परवानगी दिली असताना ठाणे पालिकेकडून मात्र हिरवा कंदील मिळालेला नव्हता. ठाणे महापालिकेच्या परवानगी अभावी ठाणे पोलिसांना हे काम सुरू करता येत नव्हते. जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांत ६



हजारांहून अधिक अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे ठाणे पोलिसांकडून बसवण्यात येणार आहेत. शहरातील सिग्नल परिसर, मुख्य चौक, शाळा, महाविद्यालय तसेच निर्जन ठिकाणी हे कॅमेरे बसविले जाणार आहेत. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून शहरातील वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच गुन्हेगारीला पायबंद घालणे शक्य होणार आहे.

ठाणे, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर ही शहरे ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात येतात. या शहरांमध्ये एकूण ३५ पोलीस ठाणे आहेत. त्यामुळे त्या शहरांमध्ये कॅमेरे बसवण्यासाठी रस्ते खोदणे तसेच इतर कामांसाठी संबंधित महापालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. इतर महापालिकांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी परवानगी यापूर्वीच पोलिसांना दिली होती. मात्र ठाणे महापालिका क्षेत्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी परवानगी देण्यात आली नव्हती. खोदकाम करताना रस्त्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ही परवानगी पालिकेकडून अडवून ठेवण्यात आली होती. मात्र आता ठाणे महापालिकेने देखील हिरवा कंदील दिला आहे.

### कॅमेऱ्यांची वैशिष्ट्ये...

प्रस्तावानुसार स्थिर कॅमेरे, ३६० डिग्रीमध्ये फिरणारे कॅमेरे, लांबून तसेच अंधारात वाहनांचे क्रमांक स्पष्ट दिसतील असे एएचपीआर कॅमेरे, तर वाहनांच्या वेगाची नोंद करणारे आरएलव्हीडी कॅमेरे अशा प्रकारचे अत्याधुनिक कॅमेरे बसविण्यात येणार असून ते ठाणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला जोडण्यात येणार आहेत. त्यामुळे पोलिसांना नियंत्रण कक्षात बसून संपूर्ण शहरातील गुन्हेगारीवर तसेच वाहतूक कोंडीवर लक्ष ठेवणे शक्य होणार आहे.

# अखेर खातीवली उड्डाणपुलाचे काम सुरू

## ८ वर्षांच्या पाठपुराव्याला आले यश

**शहापूर :** मुंबई-नाशिक महामार्गचे चौपादरीकरण झाल्यापासून चर्चेत असलेला खातीवली - वाशिंद चौफुलीवरील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाला खातीवली, वाशिंद गावातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे तब्बल आठ वर्षांनी सुरुवात झाली आहे. महामार्ग प्रशासनाने खातीवली येथील चौफुलीवर उड्डाणपुलाचे काम सुरू केल्याने येथील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. खातीवली येथील शुभवस्तू गृहसंकुल येथील महामार्ग चौफुलीवरील महत्त्वपूर्ण असलेला उड्डाणपूल सोडून इतर सर्व कामे मागील वर्षी सुरू झाली होती. मात्र महामार्ग प्रशासन व कंत्राटदाराकडून खातीवली उड्डाणपुलाबाबत निरुत्साही धोरण असल्याने खातीवलीचे माजी उपसरपंच साईप्रसाद काबाडी, ग्रामस्थ प्रशांत महाजन, एकनाथ तारमले, वाशिंद येथील सामाजिक कार्यकर्ते संजय सुरळके यांनी अनेक वर्षांपासून महामार्ग प्रशासनासोबत पाठपुरावा सुरूच ठेवला होता. आंदोलन, उपोषण, पत्र व्यवहार याद्वारे सुरू असलेल्या पाठपुराव्याला आता यश आले आहे. महामार्ग प्रशासनाने खातीवली-वाशिंद येथील चौफुलीवर उड्डाणपूल बांधण्याचा शुभारंभ केला आहे. हे काम वेळेत काम पूर्ण झाले तर महामार्गावर होणाऱ्या अपघाताचे प्रमाण कमी होईल.



# नाशिकमध्ये भररस्त्यात रिक्षा चालक महिलेसमोर नग्न झाला आणि...

**नाशिक :** महाराष्ट्रात महिला सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. भररस्त्यात रिक्षा चालकाने महिलेचा विनयभंग केला. भररस्त्यात रिक्षा चालक नग्न झाला. नाशिकमध्ये ही धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात रिक्षा चालकाविरोधात तक्रार दाखल झाल्याचे समजते.

भररस्त्यात रिक्षा चालकाकडून महिलेचा विनयभंग करण्यात आल्याने खळबळ उडली आहे. नग्न होत अश्लील हावभाव करत रिक्षा चालकाने महिलेचा विनयभंग केला आहे. महिलेच्या तक्रारीनंतर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संशयित रिक्षाचालक मिजान रजा ऊर्फ मल्ला सादिक शेखला मुंबई नाका पोलिसांनी अटक केली आहे.

संशयित आरोपी सराईत गुन्हेगार असून शहरातून तडीपार होता. रिक्षाचालकावर रॉबरीसह नाशिक मध्ये घडलेल्या दंगलीतल्या सहभागाचाही आरोप आहे. बसमधून उतरलेल्या महिलेची वाट अडवत त्याने विनयभंग केला आहे. बस चालक आणि वाहकाला मारहाण करत बसवर-ही रिक्षाचालकाने दगडफेक केल्याचे समजते.

### संस्थाचालकाचे शिक्षिकेबाबत अश्लील संभाषण

यवतमाळच्या लोहारा येथील सनराईज इंग्लिश मिडीयम स्कुलच्या संस्थाचालकाने शिक्षिकेबाबत अश्लील संभाषण केलंय. या संस्थाचालकानं शाळेतील शिक्षिकेच्या पतीला फोनवरून शिक्षिकेबाबत अश्लील भाषेत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. या धमकीचे मोबाईल संभाषण पुढे आले असून शिक्षिकेने यासंदर्भात पोलिसात तक्रार दाखल केली आहे.



# बॉयफ्रेंडच्या मदतीने स्वतःच्या मुलीचे अश्लील व्हिडिओ काढून आईनेच केले वायरल

**पुणे :** पुण्यात गुन्हेगारीनं आता अक्षरशः कळस गाठलाय. लैंगिक अत्याचार, छेडछाडीच्या घटना, अनैतिक संबंधांमधून होणारे खून अशा कितीतरी घटना दिवसागणिक कानावर पडत असताना एक लाजीरवाणी घटना घडलीय. बॉयफ्रेंडच्या मदतीने स्वतःच्या मुलीचे कपडे काढत अश्लील व्हिडिओ काढून बॉयफ्रेंड आणि नातेवाईकांना पाठवले. नंतर पोटच्या अल्पवयीन मुलीसोबत बॉयफ्रेंडला अनैतिक संबध ठेवायला लावल्याची भयंकर घटना समोर आली आहे.

अल्पवयीन मुलीने आईचे आणि तिच्या प्रियकराचे प्रेमसंबंध त्यांच्या घरमालकाला सांगितल्याने आईने हे संतापजनक प्रकार केला आहे.

भारती विकास कुऱ्हाडे आणि तिचा प्रियकर गुरुदेव कुमार स्वामी या दोघांनी मुलीचे व्हिडिओ व्हायरल करत दोघेही फरार झाले. बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ही घटना उघडकीस आल्यानंतर शनिवारी पोलिसांनी दोघांनाही अटक केली आहे. या संतापजनक प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

पुण्यातील बिबवेवाडी परिसरातून धक्कादायक प्रकार समोर आलाय. आईचं प्रेमप्रकरण लेकीने उघडं पडलं म्हणून वैरण आईने पुढच्या पोरीचे नको ते व्हिडिओ काढले. मुलीचे अश्लील व्हिडिओ काढत तिच्या बॉयफ्रेंडला मुली सोबत अनैतिक संबंध ठेवायला सांगितले. हे व्हिडिओ नातेवाईकांनाही पाठवले. व्हिडिओ व्हायरल करत वैरण आई आणि तिचा बॉयफ्रेंड दोघेही फरार झाले. पुण्याच्या बिबवेवाडी परिसरात घडलेल्या या घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. घटना घडल्याचे कळताच बिबवेवाडी पोलिसांनी शनिवारी (१२ एॅप्रिल) दोन्ही आरोपींना अटक केली आहे. स्वतःच्या अल्पवयीन मुलीसोबत संतापजनक कृत्य करणाऱ्या भारती कुऱ्हाडे आणि तिचा प्रियकर गुरुदेव कुमारस्वामी या दोघांना बिबवेवाडी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्यांच्या चौकशीत अल्पवयीन मुलीने आईचे आणि तिच्या प्रियकराचे प्रेम संबंध त्यांच्या घरमालकाला सांगितल्याने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. या घटनेने मोठी खळबळ उडाली आहे.

# नाशिकमध्ये मेलेल्या कोंबड्यांचा खच पाहून गावकरी हादरले

**नाशिक :** नाशिकमधील देवळा तालुक्यातील चिंचवे गावाजवळ एक अत्यंत विचित्र प्रकार समोर आला आहे. या ठिकाणी मोठ्याप्रमाणात मृत कोंबड्यांचा खच आढळून आला आहे. चांदवडच्या दिशेला जाणाऱ्या मार्गावर राहुड घाटाच्या पायथ्याशी रात्री मोठ्या प्रमाणावर या मृत कोंबड्या एखाद्या ट्रकमधून फेकण्यात आल्याचं बोललं जात आहे. ज्या ठिकाणी या कोंबड्या फेकण्यात आल्या त्या समोरच मारुतीरायाचे मंदिर आहे. अशा पवित्र ठिकाणी घाण टाकल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून स्थानिक नागरिक संतप्त झाले आहेत.

### अज्ञात आजाराने मरण पावलेल्या कोंबड्या

नागरिकांनी चिंचवे ग्रामपंचायतीकडे यासंदर्भात तक्रार केली आहे. या मयत कोंबड्यांपैकी अनेक कोंबड्या अज्ञात आजाराने मेलेल्या असल्याने त्याचा आरोग्यावर घातक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच मयत कोंबड्या खाण्यासाठी या परिसरात कुत्रे व इतर प्राणी जमा झाल्याने हे प्राणी माणसांवर हल्ला करण्याची शक्यता असल्याचंही सांगितलं जात आहे.

### शेतात खड्डा करुन विल्हेवाट लावण्याची मागणी

सदर घटनेबद्दल ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे. हेव्ही बॉयलर कंपनीच्या प्रतिनिधींना गावकऱ्यांनी चांगलेच धारेवर धरल्याचं दिसून आलं. सदर मृत कोंबड्या ज्या पोल्टी व्यावसायिकाने या ठिकाणी आणून टाकल्या त्यांनीच त्या भरुन त्यांच्याच शेतात खड्डा करुन विल्हेवाट लावावी असा अग्रह ग्रामस्थांनी धरला.



### अखेर या प्रकरणावर तोडगा निघाला

मात्र मध्यस्थीनंतर कंपनी प्रतिनिधींनी विनंती केल्यावर या कोंबड्यांना खड्ड्यात पुरण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच अशी घटना पुन्हा होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे अश्वासनही गावकऱ्यांना दिल्याने सद वाद शमला.

# एआयची मदत, १०० सीसीटीव्ही, फिल्मी पाठलाग अन्...

## ३६ लाख चोरणाऱ्याला मुंबई पोलिसांकडून १२ तासात अटक

**मुंबई :** मालाडमध्ये घरफोडी करुन सोने आणि हिऱ्याचे दागिने चोरणाऱ्याला चोराला पोलिसांनी १२ तासांच्या आत अटक केली आहे. मालाड परिसरात रात्रीच्या वेळेस एका इमारतीमध्ये पाईपच्या सहाय्याने चौथ्या मजल्यावर चढून एका घरातील कपाट फोडलं. या कपाटामधून चोराने सोने व हिऱ्यांचे दागिने अशी एकूण ३६ लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज पळवला. घरफोड्या करुन चोऱ्या करणाऱ्या या सराईत आरोपीला अवघ्या १२ तासांत अटक करुन पोलिसांनी गुन्ह्यातील संपूर्ण मालमत्ता हस्तगत केली आहे.

### एआयची मदत घेतली

१० एप्रिलला रात्रीच्या वेळेस मालाड पश्चिम परिसरातील एका इमारतीमधील व्यावसायिकाच्या घरात पाईपवरुन चौथ्या मजल्यावर चढून हा चोर खिडकीतून आत शिरला. घरातील लोक झोपले असताना कपाट तोडून त्याने कपाटातील सोने व हिऱ्याचे दागीने अशी एकूण ३६ लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला. यासंदर्भात मालाड पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला. मालाड पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घटनास्थळचे सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीच्या येण्याजाण्याच्या मागार्चा पाठपुरावा केला. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसणारा इसम हा अस्पष्ट दिसत होता. त्यामुळे रेकॉर्डवरील इतर गुन्हेगारांची नोंद तपासण्यात आली. पोलिसांनी केलेला तांत्रिक तपास आणि इतर चौकशीबरोबर ए.आय.च्या मदतीने सीसीटीव्हीमधील अस्पष्ट फुटेज स्पष्ट करुन तपासलं असता चोरट्याची ओळख पटली.



### आरोपीवर एकूण ३० गुन्ह्यांची नोंद

अटक आरोपी संतोष सुरेश चौधरी उर्फ वैतू हा पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून त्याच्याविरुध्द मालाड, खार, जुहू, कांदीवली, बोरीवली, चारकोप, सांताक्रूझ, अंबोली, वर्सोवा, गोरेगांव, ओशिवरा इत्यादी पोलीस ठाण्यात एकूण ३० गुन्ह्यांची नोंद आहेत. संतोष सुरेश चौधरी उर्फ वैतूकडून चोरी केलेली सोन्याचे आणि हिऱ्यांचे दागिने अशी एकूण 36 लाख ४० हजार रुपये किंमतीचा माल जप्त करम्यात आल्याची माहिती गोरेगाव विभागाचे पोलीस निरिक्षक हेमंत सावंत यांनी दिली.

### तांत्रिक तपासाच्या आधारे पाळत

३६ लाख ४० हजार रुपये किंमतीचा ऐवज पळवणारा हा चोरटा पोलीस रेकॉर्डमधील सराईत गुन्हेगार संतोष सुरेश चौधरी उर्फ वैतू असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर एकूण चार पथकं तयार करुन आरोपीताच्या मित्रांकडे चौकशी करण्यात आली. आरोपीचा मोबाईल नंबर मिळवून पोलिसांनी तांत्रिक तपास केला. खास खबऱ्यांच्या सतत संपर्कात राहून पोलीस पथकाने अवघ्या १२ तासामध्ये मेहनतीने व कौशल्याचा वापर करत आरोपीला अटक केली.

### १०० सीसीटीव्ही तपासले, फिल्मी पाठलाग

आरोपीला अटक करण्यासाठी पोलिसांनी कामाठीपूरा, जोगेश्वरी, अंबोली, अंधेरी, बांद्रा इत्यादी ठिकाणी जवळपास १०० सीसीटीव्ही कॅमेरांची पाहणी करत त्याचा शोध घेतला. शोध घेत असताना आरोपी हा जोगेश्वरी पटरीजवळ, एका कच्च्या झोपडयापाशी दिसून आला. पोलीस पथकाने आरोपीचा जवळपास एक ते दीड किलोमीटर रेल्वे मार्गाच्या बाजूने फिल्मी स्टाइल धावत पाठलाग करुन त्यास शिताफीने ताब्यात घेत अटक केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई 400063 (महाराष्ट्र), येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com